# डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.

# ध्यास उत्कृष्टतेचा




## वार्षिक नियतकालिक
## २०२०-२१

# Our Source of Inspiration



**Maharshi Swami Dayanand Saraswati**

Founder of Arya Samaj & Great Social,
Educational Reformer
(1824 - 1883)

**Hon. Padmashri Dr. Punam Suri ji**

President, DAV College Management
Commitee, New Delhi & Chancellor,
D.A.V. University, Jalandhar.





**Hon. Shri. Mahesh Chopra ji**

Local Secretary, Dayanand
Institutions and Secretary DAV
CMC, New Delhi

# (महाविद्यालयाची प्रार्थना)

एक प्रतिज्ञा असे आमुची, ज्ञानाची साधना, चिरंतन ज्ञानाची साधना ।

ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी।

तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी। ज्ञानच

देऊळ, ज्ञानच दैवत प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म

आहे।

त्यातच आमच्या उजळ उद्याचे आश्वासन

राहे।

मुक्त करील तो परंपरेच्या बंदिघरातुन मना।।२।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे।

न्यायनितीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे । जे जे

मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥३॥

.....कुसुमाग्रज

संकल्प : मानवातील उत्कृष्टतेचा ध्यास

व्रतविधान : सामाजिक परिवर्तन आणि जगण्यायोग्य सुंदर जगनिर्मितीसाठी सक्षम व वचनबद्ध शिक्षक घडविणे.

ब्रीद : ॥ तमसो मा ज्योतिर्गमय।

Mission: To prepare competent and committed teachers who transform society and make the world a better place to live in.

Vision: Pursuit of Human Excellence.

Motto: Lead Me from darkness to light.

# OBJECTIVES OF THE COLLEGE

1. To develop among student-teacher the essential competencies of a teacher in order to develop an attitude towards becoming a committed and performance oriented
teacher.

2. To enable the student-teachers to understand the philosophical and sociological
foundation of teacher education.

3. To equip the student-teacher through strong psychological foundation and with essential knowledge, skills and attitude so as to develop them as responsible teachers of the modern world.

4.To promote social cohension, improve communication and IT skills, widen vision of student teacher enabling them to adopt themselves in the situations they stands for in their lives.

5. To create awareness about values, core elements, duties and responsibilities of a teacher and foster human rights, and the dignity of individuals with a special emphasis of gender equality.

6 . To guide for observance on the principles of Arya Samaj and inculate a sence of appreciation about contribution of great personalities with special reference Swami Dayanand Saraswati.

# Our Quality Policy

(Principles Of Quality Management)

- Merit based Admissions
- rigorous internal Training programme for developing teaching Skill
- Internal Quality Assurance Cell Promoting sincerity, regularity and punctuality Leading to self discipline
- Strong feedback mechanism for Quality sustenance and quality improvement
- Observance of Professional ethics and code of conduct
- Building strong bonds of association with stakeholders
- Open transparent and fair system of evaluation
- Equalization of educational opportunity
- Maximizing learning opportunities for becoming life long learners.
- Building leadership and fellowmen-ship capacities
- Exposure to practical life and job opportunity.
- Perform Based Reward System (PBRS)

# Our Value System

a) To foster excellence in all spheres of life Including teaching.

b) To promote use of technology.

c) To inculcate national values enshrined in Constitution of India.

d) To promote human dignity, scientific temperament and perseverance.

e) To inculcate sincerity, regularity and punctuality enabling self-discipline.

f) To nurture professional ethics, code of conduct and commitments as a teacher .

g) To contribute to the national Development.

# आमचे महाविद्यालय

- शैक्षणिक व नैसर्गिक पर्यावरणपूरक परिसर
- तज्ज्ञ, अनुभवी व संशोधन प्रेरक प्राध्यापक
- नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन

- भाषा प्रयोगशाळा
- व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास शिबिरांचे आयोजन
- प्रतिवर्षी दयानंद मार्डीकर शिक्षक सक्षम पुरस्कार प्रदान

- मुलाखत तयारी व नोकरी मेळावा अयोजन
- अनुभवी सेवातत्पर शिक्षकेतर कर्मचारी वर्ग
- प्रभावी प्रत्याभरण यंत्रणा

यु.जी.सी. तर्फे विविध योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त

ऑगस्ट २०१६ सो. विद्यापीठ शहरी विभागातील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

समाजोपयोगी उत्पादक कार्य

कुलनिहाय नैमित्तिक व विशेष दिन कार्यक्रम

विविध विषय अभ्यास मंडळे

य.च.म.मुक्त विद्यापीठ बी.एड्. व डी. एस. एम. अभ्यासकेंद्र

सुसज्ज वायफाय युक्त संगणक कक्ष

.अद्यावत अध्यापन पध्दती व तंत्रांचा वापर

प्लेसमेंट समिती

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव सहभाग

निर्णय प्रक्रियेत व प्रशासनात विद्यार्थ्यांचा सहभाग

सामाजिक व राष्ट्रीय उत्तरदायित्वपर विविध कार्यक्रम

मूल्यशिक्षणपर कार्यक्रम

सोलापूर विद्यापीठ मान्यताप्राप्त शैक्षणिक संशोधन केंद्र


प्रतिभावंत व उच्च विद्या
विभूषित माजी विद्यार्थी संघटना
कार्यरत
यज्ञ हवन व आर्य समाज तत्वे
पालन
बाहय स्पर्धांची तयारी व यशस्वीतेत
सातत्य
उज्वल निकालाची परंपरा


आरोग्य
शिबीर
गुणवंत
विद्यार्थ्यांना बक्षिसे
हिमोग्लोबीन व वैघकीय तपासण्या
विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी वसतिगृहाची सोय

मी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुती प्रमाणे खरा आहे. या नियतकालिकातील माहिती ही संबंधित व्यक्तिंनी विविध स्त्रोतातून पुरविलेली आहे. माहितीच्या सत्यतेची व अधिकाराची जबाबदारी संबंधित व्यक्तिंची आहे. या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर
प्रकाशक

# प्राचार्यांचे मनोगत

सामाजिक परिवर्तन व जगण्यायोग्य सुंदर जग निर्मिती साठी सक्षम वचनबद्ध शिक्षक घडविणे' असे व्रत्त विधान असणाऱ्या आमच्या दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा 2020 -21 चा 'ध्यास उत्कृष्टतेचा' हा नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होतो आहे. सध्याच्या कोरोना महामारीच्या कालखंडातही अतिशय उत्कटतेने व उत्कृष्टपणे आपले कार्य करणाऱ्या माझ्या दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक व दयानंद शिक्षण संस्थेतील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमुळेच उत्कृष्ट प्रकारे सेवा देता आली.

या कालखंडामध्ये अध्यापनासह प्रात्यक्षिकांची सर्व कामे आमच्या महाविद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी अतिशय परिश्रमाने व चिकाटीने ऑनलाईन पद्धतीने पार पाडली. सध्याच्या कोरोणाच्या कालावधीमध्ये झूम, गुगल मीट, सिस्को वेबेक्स, गूगल क्लासरूम, मायक्रोसोफ्ट टीम्ज, गुगल फॉर्म, व्हाट्सअप इत्यादीसारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षकांना अध्यापनासाठी व अध्यापनातून आनंद घेण्यासाठी अपूर्व संधी प्राप्त झाली. प्रत्यक्ष वर्गाध्यापनाचे अनेक फायदे असले तरी सुद्धा प्रसंगी ऑनलाइनच्या माध्यमातून शिक्षकांनी अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण, समुपदेशन, विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रात्यक्षिकांच्या पूर्तता इत्यादी सर्व कार्य अतिशय आनंदाने केली. आमच्या महाविद्यालयातील शिक्षक ऑनलाइन पद्धतीने अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील आई, वडील, पती, पत्नी, आजोबा, आजी, आत्या इत्यादी सदस्यांनीही या अध्यापनाचा लाभ घेतल्याचे आम्हास कळविले आहे. काहीवेळा तर आमच्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या अध्यापनाची विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील हे सदस्य वाट पाहत असायचे. आमच्या दृष्टिकोनातून ही खरोखर फार मोठी गौरवाची गोष्ट व महाविद्यालयाच्या व शिक्षकांच्या उत्कृष्ट अध्यापनाची पोचपावतीच मानावी लागेल!

कोरोना कालावधीत आमच्या महाविद्यालयात नियमितपणे व नियोजित वेळापत्रकाप्रमाणे अध्यापनाचे, प्रात्यक्षिकांचे तास घेण्यात आले. शिक्षकांनी जादा तास घेऊन अभ्यासक्रमातील विविध प्रात्यक्षिके, अंतर्गत परीक्षा, तोंडी परीक्षा या सर्व बाबींची पूर्तता अभ्यासक्रमातील सूचनांप्रमाणे व विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे नियोजित वेळेत करण्यात आली. या बाबींचे श्रेय आमच्या शिक्षकांसह कार्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही जाते.

दोन हजार वीस एकवीस या शैक्षणिक वर्षामध्ये सकाळ इन च्या माध्यमातून घेतलेला मराठी विषयक कार्यक्रम, शिवजयंती उत्सव, कौमी एकता सप्ताह, मराठी भाषा गौरव समारंभ, हिंदी दिन, गणित दिन, शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन याच बरोबर राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील विविध नेत्यांच्या जयंती पुण्यतिथी व राष्ट्रीय उत्सवांच्या कार्यक्रमांबरोबरच एमकेसीएल बरोबरील सहकार्यातून घेतलेले राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन 'लर्निंको' वेबिनार, वाचन दिन, डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ घेतला जाणारा वाचन प्रेरणा दिन, काव्यवाचन कार्यक्रम, अनुभवी शिक्षकांच्या मुलाखती, लेखकांची मनोगते, इत्यादी कार्यक्रमांची नियोजनबद्ध आखणी करून विद्यार्थ्यांच्या मनाची मशागत करण्यात आली.

असे म्हटले जाते की विविध प्रकारच्या जीवनमूल्यांमध्ये राष्ट्राच्या वैशिष्ट्यांना व राष्ट्राच्या व्यक्तिमत्वाला अग्रस्थान देण्याची वृत्ती म्हणजे राष्ट्रवाद होय. नेहमीच्या अध्यापनात व संस्कारक्षम कार्यक्रमातून आमच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मना- मनामध्ये राष्ट्रवाद जोपासण्याचा प्रयत्न केला. या अंतर्गत साजरे केलेले स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, संविधान दिन, सरदार वल्लभ भाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी दिन, राजर्षी शाहू महाराज जयंती, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले जयंती / पुण्यतिथी, इत्यादी कार्यक्रमांनी राष्ट्राच्या व मानवतेच्या सेवेसाठी आवश्यक असणारी विद्यार्थ्यांची व कर्मचाऱ्यांची मनोभूमिका घडविली. अगदी प्राण्यांच्या संगोपनासाठी व सुरक्षेसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे सांगलीचे डॉक्टर नरेश उप्रेती यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. आमच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील नकारात्मकता घालविण्याच्या दृष्टिकोणातून व सकारात्मकता वाढवण्यासाठी

प्रेरणादायी विशेष व्याख्यानांचे आयोजन करून महाविद्यालयाचा एक वेगळा आदर्श विद्यार्थ्यांसमोर व पालकांसमोर उभा केला. विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता, सत्यनिष्ठा, अहिंसा, विनम्रता, प्रामाणिकपणा, प्रेम, सद्भाव सदाचरण, इत्यादी मूल्ये व आदर्श नीती तत्वे जोपासण्यासाठी केलेला प्रयत्न अत्यंत स्तुत्य ठरला.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रेरणा देण्यासाठी आयोजित केलेल्या चारोळ्यांची रचना करणे, काव्यरचना करणे इत्यादी कार्यक्रमनांही विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांची काही अभिव्यक्ती यानिमित्ताने या नियतकालिकातून वाचकांसमोर मांडण्यात येत आहे. उत्कृष्टतेचा ध्यास व नाविन्याचे प्रयोग करणाऱ्या आमच्या महाविद्यालयामध्ये या नियतकालिकामध्ये सादर करण्यात आलेल्या काही आशयाशी संबंधित प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखती, मनोगते, ऑनलाइन कार्यक्रम, विद्यार्थ्यांच्या विशेष प्रावीण्य प्राप्ती, शिक्षकांची व बहिस्थ व्यक्तींची व्याख्याने इत्यादी संदर्भातील ऑनलाइन लिंक या नियतकालिकांमध्ये देण्यात आलेल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराच्या सध्याच्या जगातील हे एक मोठे नाविन्यपूर्ण उपयोजन ठरेल यात शंका नाही. या ई नियतकालिकातील विविध बाबींचे वाचन करताना नियतकालिकात दिलेल्या लिंक वरती क्लिक करून वाचकांनी या बाबीचा आस्वाद अवश्य घ्यावा. नियतकालिकाच्या तयारी मधील सर्व विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व तंत्रज्ञानातील तज्ज्ञ श्री सुहास पवार, आमचे कार्यालयीन कर्मचारी, विशेष योगदान देणारे नियतकालिक विभागाचे संपादक प्राध्यापक डॉक्टर के जे शिंदे, विद्यार्थी, शिक्षक या सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो व या सर्वांसह नियतकालिकाच्या वाचकांना शुभेच्छा देतो.

थोडक्यात, सर्वच कार्यात उत्कृष्टतेचा ध्यास धरणाऱ्या आमच्या महाविद्यालयाच्या 2020 -21 चा हा ई नियतकालिक अंक स्वागतार्ह ठरेल अशी मला अशा वाटते.

प्राचार्य डॉ. एस बी क्षीरसागर

# संपादकीय

सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात दयानंद शिक्षणशास्त्र  महाविद्यालयाची एक वेगळी ओळख आहे. आमच्या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष 2020-21 साठीची  ध्यास गुणवत्तेचा ही  स्मरणिका कोरोणाच्या प्रादुर्भावामुळे सलग दुसरया वर्षी  ऑनलाइन पद्धतीने प्रकाशित होत आहे.अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी या स्मरणिकेचे प्रकाशन आम्ही करीत आहोत याचा मनस्वी आनंद होत आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुप्त गुण व्यक्त करण्याचे एक मुक्त व्यासपीठ म्हणजे ही स्मरणिका होय .

कोव्हीड 19 मुळे महाविद्यालयात विविध प्रकारचे उपक्रम ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्याशिवाय कोणताही पर्याय समोर नव्हता. तरीही अशा परिस्थितीमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यातील सुप्त गुणांना योग्य वाव देऊन ही स्मरणिका अधिकाधिक दर्जेदार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ध्यास गुणवत्तेचा या स्मरणिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांचे साहित्य लेखन, चित्रकला,  महाविद्यालयातील उपक्रमातील सहभाग यावर आधारित चिंतन मांडलेले आहे. या स्मरणिकेच्या माध्यमातून स्वरचित कविता, कथा एकांकिका, चारोळ्या, मुलाखती, त्याचबरोबर चिंतनपर विविध लेख, स्वतः रेखाटलेले रांगोळी, मेहंदी, सुंदर चित्रे त्याचबरोबर वेगवेगळ्या या ठिकाणी काढलेले सुंदर फोटो यांचा सहभाग या स्मरणिकेत केलेला आहे. त्यामुळे ही स्मरणिका विविधांगी तयार झालेली आहे.

महाविद्यालयीन अध्ययन अध्यापनाचे कार्य हे केवळ चार भिंतीच्या आत कोंडलेले नसावे. ते अनुभवावर आधारित समृद्ध करणारे विविधांगी असावे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय समोर ठेवून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी वर्षभरातील दर्जेदार व प्रभावी अध्ययन - अध्यापन कार्याबरोबरच

विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी केलेले परिश्रम व धडपड याचे प्रतिबिंब म्हणजे ही स्मरणिका होय.

ही स्मरणिका गुणवत्तापुर्ण होण्यामागे महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी हातभार लावल्याबद्दल संपादक या नात्याने मी सर्वांचे ऋण व्यक्त करतो. त्याच बरोबर माननीय प्राचार्य, डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी ही स्मरणिका तयार करण्यासाठी मला जबाबदारी दिली, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच, प्रिंटर्स प्रमुख .श्री. मधुकर जक्कन यांनी अल्पावधीत कलात्मक व सुबक छपाई करून दिली आहे त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक धन्यवाद!

आमच्या महाविद्यालयाशी संबंधित सर्व शिक्षण प्रेमी , रसिक वाचक आमच्या या ध्यास गुणवत्तेचा स्मरणिकेचे स्वागत करतील ही अपेक्षा!

संपादक :- डॉ. के. जे. शिंदे

***संपादक मंडळ ***

| अध्यक्ष, | संपादक, |
|---|---|
| प्राचार्य, डॉ. एस. बी. क्षीरसागर | डॉ. के. जे .शिंदे |

**विद्यार्थी संपादक मंडळ**

**विद्यार्थी संपादक**

**कु. प्रतिक्षा शिंदे**

| **बी. एड्.** 2020-22 | **बी. एड्.** 2019- 21 |
|---|---|
| **सदस्य-** | |
| **१) कु. तृप्ती मोरे** | **कु. रूपाली चौलगी** |
| **२) कु. माधुरी पवार** | **कु.अश्विनी गोरे** |
| **३) श्री. सद्दाम पटेल** | **श्री. सुमित गाडेकर** |
| **४) कु. रोहिणी देवकते** | |

# D. P. B. Dayanand College of Education, Solapur

## IQAC COMMITTEE

| Sr. No | Name of the member | Designation |
|---|---|---|
| 1. | Dr. S. B. Kshirsagar | Chairperson & Principal of the College |
| 2. | Dr. U. M. Rao | Member (Senior Administrative Officer & Principal, Dayanand Law College) |
| 3. | Dr.Smt.K.A.Pandey | Member Principal D. A. V. Velankar College of Commerce Solapur |
| 4. | Dr. V. P. Ubale | Principal D. B.F. Dayanand College of Arts & Science, Solapur |
| 5 | Dr.R.N.Mulik | Member (Secretary Alumni Association , DPBDCE) |
| 6 | Dr. Smt. P.R. Bhoje | IQAC – Coordinator- of the College |
| 7 | Dr. V. B. Kidgaonkar | IQAC - Co-coordinator of the College |
| 8 | Dr.H.N.Jagtap | Ex-Principal of the College External Member and Advisor |
| 9 | Dr. L. V. Bamane | Member |
| 10 | Dr. K. J. Shinde | Member |
| 11 | Shri.S.K.Surywanshi | Member |
| 12 | Shri.A.S.Gandhale | Member (Librarian) |
| 13 | Shri. P. K. Divanji | Member (Management Representative) |
| 14 | Shri. A.S.Mahamuni | Member (Head Clerk ) |
| 15 | Shri. S. S.Fulzalke | Member (Clerk) |
| 16 | Dr. Yevale N. A. | Member (Nominee from Local Society & and an alumnus ) |
| 17 | Shri. P. M. Madhekar | Member (Nominee from Local Society & alumnus) |
| 18 | Gadekar Yallappa Anand | Member (B.Ed. Student -2019-21 batch |
| 19 | Swami Shubhada Nagayya* | Member (B.Ed. Student -2019-21 |
| 20 | Patel Saddam | B.Ed. Student 2020-22 |
| 21 | Pawar Sneha | B.Ed. Student 2020-22 |

# महाविद्यालय विद्यार्थी परिषद २०२०-२१

| अ.क्र. | पद | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| १. | सभापती | श्री. यलप्पा आनंद गाडेकर |
| २. | सचिव | श्रीमती प्रतिक्षा किसन शिंदे |
| ३. | महिला प्रतिनिधी | १. कु. शुभदा नागय्या स्वामी<br>२. कु. प्राजक्ता देविदास वाघचवरे<br>३. कु. जाधव सुप्रिया शहाजी<br>४. कु. बिराजदार पुजा शंकरराव |
| ४. | अ.जा./विमुक्त इतर मागास | श्री. योगेश सिध्दराय एडके<br>कु. कांबळे मिनाक्षी नागनाथ |
| ५. | वर्गप्रतिनिधी | कु. अश्विनी श्रीरंग गोरे<br>श्री. होनकळस नागेश रमाकांत |
| ६. | समाजसेवा प्रतिनिधी | श्री. सनी उमाकांत शिंदे<br>कु. अश्विनी बंडू वाघमोडे |
| ७. | एन.सी.सी. प्रतिनिधी | श्री. किरण मारूती बिराजदार<br>श्री. चौगुले विजयकुमार शंकर |
| ८. | क्रीडा प्रतिनिधी | श्री. सुरजकुमार संतोषकुमार ढमाळ<br>श्री. बिराजदार सुरजकुमार काशिनाथ |
| ९. | वार्षिक अंक प्रतिनिधी | कु. प्रज्ञा सुरेश भद्रशेट्टी<br>कु. पाटील मुक्तेश्वरी राजशेखर |
| १०. | संगणक कार्य प्रतिनिधी | श्री. महेश लक्ष्मीपुत्र पाटील<br>श्री. पटेल परवेज खाजामोद्दीन |
| ११. | सांस्कृतिक विभाग प्रमुख | कु. रूपाली पंडीत चौलगी<br>कु. पाटील अर्चना चंद्रकांत |

# D. P. B. Dayanand College of Education, Solapur

| Sr. No. | College Development Committee<br>Year 2020-21 | |
|---|---|---|
| 1 | Shri. Mahesh ji Chopra | Chairman |
| 2 | Shri. S. S. Katkar | Nominee of (Local) Management Secretary |
| 3 | Shri. Shrikant More | Local Member-Nominated by Management (Alumnus) |
| 4 | Prin. Dr. V.P. Ubale | Local Member-Nominated by Management |
| 5 | Shri. R.G. Miniyar | Local Member-Nominated by Management |
| 6 | Prin. Dr. Mrs. S.B. Rathi | Local Member-Nominated by Management |
| 7 | Dr. K. J. Shinde | Head of the Department nominated by Principal/Head of the Institution. |
| 8 | Dr. Mrs. L.V. Bamane | Elected Member(Teaching-Ladies) |
| 9 | Dr. K.J. Shinde | Elected Member (Teaching- Gents) |
| 10 | Dr. V.B. Kidgaonkar | Nominated Member (Teaching-Gents) |
| 11 | Shri. S.R. Suryawanshi | Elected Member (Non-Teaching) |
| 12 | Dr. Smt. P.R. Bhoje | Co-ordinator IQAC Committee |
| 13 | Miss. Rathod B.R. | President and Secretary of the College Students Council. |
| 14. | Prin. Dr. S.B. Kshirsagar | Member- Secretary |

# Teaching and Non Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Dr. Kshirsagar S. B. | Principal & Kendra Sanchalak YCMOU B.Ed. & DSM |
| 2. | Dr. Smt. Bhoje P. R. | Professor, IQAC & NAAC Coordinator |
| 3. | Dr. Kidgaonkar V. B. | Professor |
| 4. | Dr. Shinde K. J. | Professor |
| 5. | Dr. Bamane L.V. | Associate Professor |
| 6. | Dr. Suryawanshi S. K. | Assistant Professor |
| 7. | Dr. Panhalkar S. S. | Assistant Professor |
| 8. | Smt. Kasabe R. S. | Assistant Professor |
| 9. | Shri. Chharaband S. M. | Art & Craft Teacher |
| 10. | Shri. Mahamuni A. S. | Head Clerk |
| 11. | Shri. Fulzalke S.S. | Junior Steno |
| 12. | Shri. Pradip Kulkarni | Head Clerk |
| 13. | Shri. Kiran Katakdhond | Senior Clerk |
| 14. | Shri. Suhas Pawar | Junior Clerk |
| 15. | Shri.S. K. Bandgar | Peon |
| 16. | Shri. S. K. Suryawanshi | Peon |
| 17. | Shri. Y. D. Unhalke | Peon |
| 18. | Shri. V. M. Vhanmane | Peon |
| 19. | Shri. A. P. Shitole | Peon |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. | सन 2020-21 या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालय उपक्रमांचा वार्षिक अहवाल | डॉ. के. जे. शिंदे | 21-29 |
| | **मराठी विभाग** | | |
| 2. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर | तृप्ती मोरे | 31 |
| 3. | तंबाखूचे दुष्परिणाम | सुप्रिया जाधव | 35 |
| 4. | पंढरपूरची खाद्यसंस्कृती | तृप्ती मोरे | 38 |
| 5. | दृष्टीकोन | रोहिणी देवकते | 41 |
| 6. | रचले मनी मनोरे, खचले चिरे तयांचे | माधुरी पवार | 43 |
| 7. | अणुकेंद्रकाचा शोध | मनिषा गोविंदे | 48 |
| 8. | एक होता कार्व्हर वीणा गवाणकर | रोहिणी देवकते | 51 |
| 9. | मराठी भाषेची सक्ती | अश्विनी गोरे | 53 |
| 10. | प्रवासवर्णन | रोहिणी देवकते | 55 |
| 11. | घरोघरी गाडगेबाबा- प्रा. रा. तु. भगत | रूपाली चौलगी | 59 |
| 12. | आयुष्याचे धडे गिरवताना | प्रज्ञा भद्रशेट्टी | 65 |
| 13. | राजर्षी शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण | श्रध्दा खराडे | 70 |
| 14. | स्त्रीत्व | अनुराधा मार्कंड | 74 |
| 15. | संविधानातील शैक्षणिक कलम | कविता रच्चा | 78 |
| 16. | जीवन जगताना | माधुरी पवार | 79 |
| 17. | शेती अशीच असती | स्वाती शिंदे | 82 |
| 18. | महाराष्ट्रातील संत परंपरा | स्वाती शिंदे | 84 |
| 19. | माझा जिल्हा, माझं सोलापूर | रुपाली चौलगी | 88 |
| 20. | विनम्रशीलता | रुपाली चौलगी | 92 |
| 21. | आत्मविश्वास आणि स्वाभिमान | शिंदे प्रतिक्षा | 93 |
| 22. | महात्मा ज्योतिबा फुले | रोहिणी देवकते | 94 |
| 23. | महापुरूषांची Documentry | सुमित गाडेकर | 96 |
| 24. | चारोळया | अश्विनी वाघामेडे | 98 |
| 25. | माझ्या वैयक्तिक रचना | सद्दाम पटेल | 99 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26. | माझी मावशी | अश्विनी स्वामी | 100 |
| 27. | आई | क्रांती माने | 101 |
| 28. | वशिला | अश्विनी वाघमोडे | 103 |
| 29. | ज्ञानाचे दहा मोती | अश्विनी वाघमोडे | 104 |
| 30. | शेतकरी राजा | मुक्तेश्वरी पाटील | 105 |
| 31. | चारोळी | सुरजकुमार बिराजदार | 106 |
| 32. | जगात सुंदर माझी आई | विजयकुमार चौगुले | 107 |
| 33. | दोन मुली | माधवी मड्डी | 109 |
| 34. | जीवन आणि मृत्यूचा हा प्रश्न आहे. | श्रध्दा खराडे | 110 |
| 35. | आई<br>जीवन | रूपाली चौलगी | 111 |
| 36. | महागाई<br>मी खरंच खूप खास | प्रतिक्षा शिंदे | 112 |
| 37. | आई- बाप कुणा कळतं नाही | रोहिणी सोनगे | 114 |
| 38. | महाविद्यालयातील माझा अनुभव | सुहास पवार | 116 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 39. | I love Chemistry | माधुरी पवार | 122 |
| 40. | हिंदी लेखक- जयशंकर प्रसाद | कविता रच्चा | 124 |
| 41. | कोराना | जवेरिया माडीघर | 127 |
| | **इंग्रजी विभाग** | | |
| 42. | Eco – Criticism a study | Sumit Gadekar | 129 |
| 43. | Who am I ? | Nazia Mujawar | 134 |
| 44. | Puzzle | Shital Rajmane | 136 |
| | **उर्दू विभाग** | | |
| 45. | गजल | जवेरिया माडीघर<br>शेख नाहीद अक्तर<br>शेख नुसरत | 138 |
| | **कन्नड विभाग** | | |
| 46. | कन्नड शिक्षक मुलाखत<br>आई- बाप कुणा कळत नाही. कन्नड कविता | रोहिणी सोनगे | 151 |
| 47. | विद्यार्थ्यांनी काढलेले सुंदर फोटो, रांगोळी, चित्रकला | | 158 |
| 48. | महाविद्यालयातील काही कार्यक्रम फोटो | | 170 |

# बी. एड्. २०२० – २१ महाविद्यालय उपक्रम अहवाल

१) दि. ०१/०८/२०२० - **लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रम-** रोजी सकाळ १०.४५ वाजता दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजनाचाकार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत दयानंद कुल व सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्व विकास विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. बी. किडगांवकर यांनी केले.यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे सर, प्राचार्य डॉ. एस.बी.क्षीरसागर , प्राचार्य डॉ. पांडे मॅडम यांनी प्रतिमापूजनकेले. त्याचप्रमाणेदयानंद संस्थेतील प्राध्यापक, कर्मचारी यांनी प्रतिमापूजनकेले.

२) दि. ०१/०८/२०२० **पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, वर्धापन दिन साजरा-** रोजी पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचा वर्धापनदिन सोहळा दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर यांच्या वतीने 'पोगुल मुक्तांगण' मध्ये साजरा झाला. यावेळी प्राचार्य डॉ.एस.बी.क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नंतर सोलापूर विद्यापीठगीत सादर करण्यात आले. त्यानंतर डॉ. क्षीरसागर यांनी सोलापूर विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला व विद्यापीठाच्या योगदानात दयानंद संस्थेच्या योगदानाचा आढावा घेतला आणि सर्वांना या दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या उपक्रमास प्राचार्य डॉ. उबाळे सर, प्राचार्या डॉ. पांडे मॅडम, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

३) दि.**०८/०८/२०२०मुलाखतीचा कार्यक्रम-** ज्येष्ठ शिक्षणविस्तार मा. अशोक भांजे सर यांच्या - सकाळच्या सत्रातील कार्यक्रमानंतर सकाळी ११.५० वाजता सोलापूरातील अधिकारी आयोजित करण्यात आला.दयानंदकुलप्रमुखडॉ. व्ही. बी.किडगांवकर यांनी पाहुणे श्री.अशोक भांजे सर यांचा परिचयकरूनदिला. प्राचार्यांनी ऑनलाईन स्वरूपात पाहुण्यांचे स्वागतकेले. यानंतर श्री.गाडेकर वाय. ए. व कु. अश्विनीगोरे यांनी भांजे सरांची सविस्तर मुलाखतघेतली. दयानंदशिक्षणशास्त्र महाविद्यालयातील माजी विद्यार्थी (बी. एड.व एम. एड.)श्री. भांजे सर यांनी आपला जीवन प्रवास, परिस्थिती, दयानंदमधीलदिवस, शिक्षणक्षेत्रातील अनुभव, शिक्षणपध्दतीमधील फरक, समाजसेवा, स्वतःच्या शैक्षणिक संस्था या अनुषंगाने मार्गदर्शनकेले व विद्यार्थ्यांच्या शंकांना उत्तरदिले. यानंतर अध्यक्षीय मनोगत व्यक्तकरतानाडॉ.क्षीरसागर सर यांनी भांजे सर यांची प्रगती, प्रयत्न व प्रेरणा या

संदर्भानेविवेचनकेले. या कार्यक्रमाचे आभार व आपल्या भावनाडॉ. पी. आर. भोजे यांनी व्यक्तकेल्या.

४) दि १३/०८/२०२० **जागतिक अवयवदान दिनानिमित्त राज्यस्तरीय वेबीनार** द. प्रे. भै. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर आणि देहांगदान अवयवदान समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अवयवदान दिनानिमित्त मा. श्री. डॉ. संदीप होळकर यांचे 'अवयवदान : काळाची गरज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून देताना महाविद्यालयाचा परिचय, पाहुण्यांचे स्वागत व अवयवदान उपक्रमाची थोडक्यात माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. होळकर यांनी अवयवदान संकल्पना, गरज व महत्व स्पष्ट केले. यानंतर डॉ. व्ही. पी. उबाळे सरांनी मनोगत व्यक्त केले. श्री. अरूण गोरटे, देहांगदान अवयवदान संस्था, सोलापूर आणि आपल्या संस्थेचे कार्य स्पष्ट करून पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही. बी. किडगांवकर यांनी केले.

**५)** १५ ऑगस्ट २०२०, **भारतीय स्वातंत्र्यदिन-ध्वजारोहण कार्यक्रम -** सकाळी ७.१५ वाजता या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्राचार्या डॉ. कीर्ती पांडे यांचे आगमन झाले. ७.२६ मिनिटांनी पाहुण्यांच्या हस्ते एन. सी. सी. कॅडेडच्या सलामी नंतर ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत झाले व पाहुण्यांचे मार्गदर्शन झाले. त्यामध्ये त्यांनी स्वातंत्र्य चळवळ आढावा ते आजची प्रगती, राममंदिर बांधणी घोषणा व भारताचे भविष्य या अनुषंगाने मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. किरण चोकाककर सर यांनी आभार मानले. यानंतर एका विद्यार्थीथीने 'ए मेरे वतन के लोगो' हे गीत सादर केले. या कार्यक्रमास सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, एन. सी. सी. मधील काही विद्यार्थी हजर होते.

6) दि. ०५/०९/२०२० **शिक्षक दिन** - दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर, गुलमोहर कुलाच्या वतीने व ऑनलाईन पध्दतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. सिध्देश्वर कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. मन्मथ उकरंडे सर हे उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर सर हे अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमासाठी डॉ. के. जे. शिंदे सरांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता वाघचवरे यांनी केले. प्रास्ताविक अंजली कल्याणशेट्टी व पाहुण्यांचा परिचय सुमित गाडेकर यांनी करून दिला. प्रतिक्षा शिंदे, महेश पाटील व रूपाली चौलगी यांनी आपले मनोगत मांडले. त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. उकरंडे सरांनी अतिशय प्रेरणादायी विचार स्पष्ट केले. त्याचप्रमाणे अध्यक्ष प्राचार्य सरांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार सपाटे यांनी मानले.

७) दि. १९/०९/२०२० हिंदी दिन - कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी अधिव्याख्याता डॉ. बी. बी. पठाण व डॉ. एस. पी. पन्हाळकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शुभदा स्वामी यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षक पायप्पा दोड्डी यांनी हिंदी दिनाचे महत्व सांगितले. रूपाली चौलगी, अंजली कल्याणशेट्टी, गाडेकर, श्राविका बुगडे, पल्लवी हिरेमठ व डॉ. पी. आर. भोजे यांनी हिंदी काव्यवाचन केले. डॉ. बी. बी. पठाण व डॉ. एस. पी. पन्हाळकर यांनी हिंदी भाषेचे महत्व, राजभाषेची पार्श्वभूमी यावर आपले विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरूणा पवार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार शुभदा स्वामी यांनी मानले.

८) २३/०९/२०२० वृक्षारोपण कार्यक्रम-सकाळी ठिक १०.३० वाजता दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय व रोटरी क्लब सोलापूर सिध्दिग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी वेगवेगळया प्रकाराच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.याप्रसंगी रोटरी क्लबचे माजी सहप्रांतपाल श्री. राकेश उदगिरी, अध्यक्ष श्री. शिवानंद हिरेमठ, सचिव श्री.विजयकुमार शिंदे, माजी अध्यक्ष श्री. आशिष उपाध्ये, खजिनदार श्री. संतोष पेद्दी, सदस्य श्री. शिवयोगी वाले, श्री. चंद्रशेखर उदगिरी, श्री. शांतप्पा नंदर्गी, श्री.ज्योतीराम शिंदे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य रोटरियन डॉ. एस. बी. क्षीरसागर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. दयानंद शिक्षणसंस्था सोलापूरचे स्थानिक सचिव श्री. महेश चोप्रा साहेब यांच्या वतीने प्राचार्य डॉ. एस.बी. क्षीरसागर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

9) दि.26 सप्टेंबर 2020 – पालक सभा आयोजन:- रोजी शिक्षक पालक सभेचेआयोजन करण्यातआले. सदर सभा ऑनलाईन घेण्यातआली. सभेस विद्यार्थी व पालक उपस्थित होते. माननीय प्राचार्य यांनी महाविद्यालयातील सुविधा, विद्यार्थ्यांची प्रगती, विद्यापीठ निकाल,भावी काळातील योजना याविषयी पालकांना माहिती दिली. या सभेत द्वितीय वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांची शिक्षक पालक संघात सदस्यपदी निवड करण्यात आली.

१०) दि.०३/१०/२०२० -महात्मा गांधी और लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम संपन्न– सुबह ११.३० को दयानंदकुल छात्रोंकी तरफ से महात्मा गांधी और लालबहादूर शास्त्रीजयंतीकाकार्यक्रम आयोजितकिया। इस कार्यक्रमका प्रास्ताविक श्री. पाटील महेश नेकिया। उन्होंने कार्यक्रमका स्वरूप स्पष्ट किया । उसके बादछात्र मनोगतकु. प्रतिक्षाशिंदे जी ने लालबहादूर शास्त्रीजीकीजीवनीस्पष्ट की औरगाडेकर यल्लप्पा ने महात्मा गांधीका स्त्रीके प्रती सम्मानपूर्णकार्य स्पष्ट करते

समय आज महात्मा गांधीके प्रतिदेशके वातावरणके बारे मे जानकारी स्पष्ट की।डॉ.किडगांवकर जी ने महात्मा गांधी और शास्त्रीजीकाजीवनकालस्पष्ट करते समय उनकी जीवनकी कुछ घटना, मूल्यों, आदर्श की जानकारी दी और उनके विचारोंकी आज की उपयोगीता स्पष्ट की।प्रधानाचार्यजी डॉ.क्षीरसागर एस.बी. महात्मा गांधीकी जीवननिष्ठा, अहिंसा कातत्व, उनकीकिताबे, सत्यके प्रयोग, उनके शक्तीस्थलके बारे मेंजानकारीदी और सादगीभराजीवनकैसे जी सकते है इसके बारे में लालबहादूर शास्त्रीजीका उदाहरण दिया।अंत मेंकिरणबिराजदार जी ने आभार प्रकटकिया। कु. अश्विनीगोरे जी ने बहुत अच्छा सूत्रसंचालनकिया।

11) दि.10/10/2020' काव्यवाचन कार्यक्रम- हुतात्मा कुलाकडून ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आला. त्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. एल. व्ही. बामणे मॅडमनी भूषविले. तर या कार्यक्रमास डॉ. राजशेखर शिंदे सर हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमात काही विदयार्थ्यांनी कवितांचे वाचन केले. नंतर प्रमुख पाहुण्यांचे मनोगत झाले व डॉ. एल. ही बामणे मॅडम यांच्या कविता वाचनाने व मनोगताने कार्यक्रमाचा शेवट झाला.

12) दि. 15/10/2020 वाचन प्रेरणा दिन - रोजी दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गुलमोहर कुल आयोजित डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालय प्राचार्य श्री. एस. बी. क्षीरसागर सरांनी भूषविले. व ऑनलाईन प्रतिमापूजन झाले.

13) या कार्यक्रमासाठी गुलमोहर कुलाचे कुलप्रमुख प्रा. डॉ. के. जे. शिंदे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली कल्याणशेट्टी यांनी केले. प्रास्ताविक कुलाचे मार्गदर्शक डॉ. शिंदे सर कुलाचे मार्गदर्शक यांनी केले. या कार्यक्रमासाठी हनुमंत खुपसे, कविता रच्चा, सनी शिंदे, सुरज ढमाळ, पुजा वाईकर, निकीता जोशी यांची मनोगत झाली. कार्यक्रमासाठी भित्तीपत्रकाचे वाचन करण्यात आले.

१४) २७/१०/२०२० ते ०२/११/२०२० ‘दक्षता जनजागृती सप्ताह’ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या निर्देशाप्रमाणे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग सूचनेनुसार ‘दक्षता जनजागृती सप्ताह’ आयोजित करण्यात आला. या सप्ताह निमित्ताने पुढील उपक्रमांचे

आयोजन करण्यात आले.भ्रष्टाचार निर्मूलन शपथ दि.२८/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता देण्यात आली. भ्रष्टाचार निर्मूलन व्याख्यान व मार्गदर्शन :- या उपक्रमांतर्गत डॉ. पी. आर. भोजे यांचे 'भ्रष्टाचार निर्मूलन' या विषयावरती शनिवार दि.३१/१०/२०२० रोजी ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार, अधिकाराचा भ्रष्टाचार, विचारांचा भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी मनोवृत्ती या संदर्भाने मार्गदर्शन केले.

१५) दिनांक ३१/१०/२०२० **-राष्ट्रीय एकात्मता दिवस-** सरदार वल्लभभाई पटेल जयंती, इंदिरा गांधी पुण्यतिथी. डॉ. पी.आर. भोजे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली 'संजीवन कुलाकडून' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस.बी. क्षीरसागर सर या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रूपाली चौलगी व प्रस्तावना अरूणा पवार यांनी केली. त्यानंतर सनी शिंदे यांनी वल्लभभाई पटेल यांच्या बालपण व शिक्षणावर आपल्या मनोगतातून प्रकाश टाकला. माधवी गरदास यांनी थोडक्यात त्यांचे कार्य मांडले. त्यानंतर कुलाच्या मार्गदर्शिका डॉ. भोजे मॅडम यांनी भ्रष्टाचार निर्मूलन यावर व रूपाली चौलगी यांनी राष्ट्रीय एकात्मता दिवसावर आपले विचार व्यक्त केले. शेवटी प्राचार्यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी भाषणादरम्यान सरदार पटेल यांच्या स्मारकाला भेट दिल्याप्रसंगीचे फोटोही दाखवले. आपल्या आठवणींना उजाळा दिला. सरतेशेवटी सनी शिंदे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले.

16)दि. 23/11/2020 **कौमी एकता सप्ताह-** रोजी वार सोमवार दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर, गुलमोहर कुलाच्या वतीने ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. मोहन देवीदास कटाप सर दयानंद विधी महाविद्यलय सोलापूर हे उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री. एस. बी. क्षीरसागर सर हे उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी कुलाचे मार्गदर्शक डॉ. के. जे. शिंदे सर याचे वेळोवेळी योग्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांनी लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय सपाटे यांनी केले. प्रास्ताविक कविता रच्चा यांनी केले. अतिथी परिचय डॉ. के. जे. शिंदे सर यांनी केले. अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर आभार प्राजक्ता वाघचवरे यांनी मांडले.

१७) दि. २८/१२/२०२० राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस - दयानंद कुलाच्या वतीने १८ डिसेंबर राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. गुलरेज मड्डी, विभाग प्रमुख, मौलाना आझाद पॉलिटेक्नीक, सोलापूर यांनी सविस्तर व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी अल्पसंख्याक संज्ञा स्पष्ट केली. त्याचबरोबर संविधानातील पूरक कलमे यांचे सविस्तर विवेचन केले. त्याचबरोबर संविधानातील पूरक कलमे यांचे सविस्तर विवेचन केले. त्याचबरोबर

अल्पसंख्याकाचे प्रकार, अल्पसंख्याकासाठी मा. पंतप्रधानांचा पंधरा कलमी कार्यक्रम, राज्यशासन व केंद्रशासनाच्या योजनांचे सविस्तर स्पष्टीकरण पीपीटीद्वारे केले. यामध्ये तंत्रनिकेतन सुरू करणे, ग्रामीण शहरी भागात सुविधा, शिक्षणासाठी पायाभूत सुविधा, पोलिस भरती, हेल्पलाईन साहित्य आकादमी, शिष्यवृत्ती, नवी उडाण, जियो पारसी, आरोग्य योजनांची सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. पी. आर. भोजे यांनी स्वीकारले. त्यांनीही अल्पसंख्याक समाज व वस्तुस्थिती या विषय आशयाने मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. व्ही.बी. किडगांवकर, पाहुण्यांचा परिचय डॉ. एल व्ही. बामणे यांनी केला. तर आभार प्रदर्शन श्री. महेश पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर ही उपस्थित होते. विद्यार्थ्यांना एका वेगळया विषयाविषयी माहिती करून घेण्याची संधी मिळाली.

18) दि.16/1/2021 **साहित्यिकेची मुलाखत**' रोजी मराठी भाषा पंधरवड्याच्या निमित्ताने ऑनलाईन पध्दतीने एका हा कार्यक्रम पार पडला. त्याकार्यक्रमासाठी सौ. आशा पाटील(लेखिकावशिक्षिका) मॅडम प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर सर होते. याकार्यक्रमामध्येआश्विनीगोरेयांनीप्रमुखअतिथींचीमुलाखतघेतलीनंतरअध्यक्षीयमनोगतझाले. वैशालीअघोरमॅडमनीमराठीभाषेच्यासंवर्धनासाठी तसेच वाचन संस्कृतीच्या विकासासाठी तरुणपिढीने काय अपेक्षित आहे या विषयावर आपले मनोगत व्यक्तकेले.

19)दि. 4/1/2021 '**सावित्रीबाई फुले यांची जयंती**'- ऑनलाईन पध्दतीने हुतात्मा कुलाकडून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस. बी. क्षीरसागर हे होते. या कार्यक्रमामध्ये विदयार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी माहीती दिली. व आपली मनोगते केली. नंतर कुलाच्या मार्गदर्शिका डॉ. एल्. व्ही. बामणे यांचे मनोगत झाले व अध्यक्षीय मनोगतानंतर कार्यक्रम संपला.

20) **4 ते 12 डिसेंबर 2000 शालेय आंतरवासिता**- Covid-19मुळे सर्व शाळा व महाविद्यालय ऑफलाइन चालू असल्यामुळे चालू शैक्षणिक वर्षमध्ये ऑनलाईन शालेय आंतरवासिता घेण्यात आली सत्र तीन मध्ये दिनांक 24 नोव्हेंबर 2020 ते तीस नोव्हेंबर 2020 व यादरम्यान शालेय आंतरवासिता घेण्यात आली विद्यापीठाच्या निर्देशानुसार शालेय आंतरवासितामध्ये घेण्यात येणारे उपक्रमही विद्यार्थ्यांनी परिसरातील अध्ययनार्थीयांच्यावर राबविले.

२१) ३०/०१/२०२१ महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन कार्यक्रम- दयानंद कुलाच्यावतीने ऑनलाईन "महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. किडगांवकर यांनी सर्वांचे स्वागत केले.यानंतर कु. देवकते रोहिणी यांनी पीपीटी द्वारा महात्मा गांधींच्या कार्यांचा आढावा घेण्यात आला. तर पाटील मुक्तेश्वरी यांनी महात्मा गांधींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान स्पष्ट केले. त्यानंतर डॉ. किडगांवकर यांनी महात्मा गांधीचे बालपणातील अनुभव व त्याद्वारे व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, गांधीवाद व स्वातंत्र्य चळवळीतील योगदान स्पष्ट केले व महात्मा गांधी यांची प्रसंग चित्रे पीपीटीद्वारे स्पष्ट केले.त्यानंतर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी महात्मा गांधीची

अकरा तत्त्वे, नीतिमत्ता, मानवाच्या जीवनात सत्याचे महत्त्व व जागतिक पातळीवरील योगदान या संदर्भाने मार्गदर्शन केले.शेवटी कु. अश्विनी गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

२२) दि.०९/०२/२०२१ संत रोहिदास जयंती कार्यक्रम वृत्तांत-रोजी महाविद्यालयात संत रोहिदास जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. किडगांवकर व्ही. बी. यांनी प्रास्ताविक केले व संत रोहिदास यांचे कार्य स्पष्ट केले. त्यामध्ये संत रोहिदास जन्म, १४ व्या शतकातील त्यांचे कार्य, लोकांना मदत, सामाजिक कार्य, गुरूग्रंथ साहिबमध्ये ४१ भक्तीगीतांचा समावेश या संदर्भाने संत रोहिदास यांचे वर्णन केले. ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. पी. आर. भोजे यांच्या हस्ते संत रोहिदास यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

२३) दि. १५/०२/२०२१ - संत जगनाडे महाराज व संत सेवालाल महाराज - यावेळी मा. प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांच्या हस्ते प्रतिमापूजन व अभिवादन करण्यात आले. यानंतर सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिवादन केले.

२४) दिनांक -20/02/2021 **शिवजयंती** - गुलमोहर कुलाच्या वतीने ऑफलाईन पध्दतीने शिवजयंती कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्षस्थानी डॉ. एस. बी. क्षीरसागर होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता वाघचवरे पीपीटी प्रदर्शन चौगुल व बिराजदार यांनी केले. दुलंगे, पटेल, रच्चा, गोरे, होनकळस यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पोस्टर सादरीकरण पाटील, वाघमोडे, फाळके, पटेल, राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे आभार कांबळे यांनी मांडले.

25)दि.27/2/2021 रोजी मराठी भाषा पंधरवड्याच्या निमित्ताने नवनिर्मितीतून काव्यनिर्मिती' हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. विदयार्थ्यांनी आपल्या स्वरचित कवितांचे वाचन केले. नंतर कुलाच्या मार्गदर्शिका व कवयित्री डॉ. एल्. व्ही. बामणे मॅडमनी आपल्या कविता सादर केल्या. अशाप्रकारे हा कार्यक्रम पार पडला.

२६) दि. २७/०२/२०२१ मराठी भाषा गौरव दिन- महाविद्यालयातील बी. एड. प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांच्या व विषयप्रमुख प्रा. डॉ. बामणे लता यांच्या सहविचाराने कार्यक्रमाचे दूरभाष्य प्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. एस. एन. शिंदे, प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर व सकाळ आवृत्तीचे यीन (YIN) चे समन्वयक श्री. अभिजीत शिंदे व अध्यक्ष डॉ. लता विष्णू बामणे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेविषयीचे मनोगत पूजा दुलंगे पाटील महेश, रच्चा कविता, बिराजदार, चौलगी रूपाली यांनी व्यक्त केले. बिराजदार सुरजकुमार व चौगुले विजयकुमार यांनी व्हिडियोचे सादरीकरण केले. प्रथम व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रिकेचे आयोजन केले. प्रमुख अतिथी डॉ. एस. एन. शिंदे यांनी मराठीतील संत परंपरा साहित्याचा आढावा घेऊन मराठीचे सत्व व स्वत्व जोपासण्यासाठी आपण जास्तीत जास्त मराठीचा वापर करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. लता बामणे यांनी विद्यार्थ्यांच्या मनोगताचा आढावा घेऊन मराठी भाषेचे संवर्धन व संक्रमण करण्यासाठी मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याची आवश्यकता स्पष्ट केली

२७) दि. १२ मार्च २०२१ यशवंतराव चव्हाण यांची जयंती कार्यक्रम - डॉ. पी. आर. भोजे यांनी पूजन केले व अभिवादन केले यावेळी डॉ. व्ही. बी. किडगांवकर यांनी यशवंतरावजी चव्हाण यांचा जीवनप्रवास स्पष्ट केला. यावेळी सर्व प्राध्यापक, कर्मचारी, मुक्त विद्यापीठ विद्यार्थी यांनीही अभिवादन केले.

२८) १३/०३/२०२१ - जागतिक महिला दिन ८ मार्च- महाविद्यालयाच्या नियोजनानुसार डॉ. व्ही. बी. किडगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कुलाच्या वतीने सकाळी ऑनलाईन १०.४५ वाजता जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कु. अश्विनी गोरे व कु. अर्चना पाटील यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात कु. रूपाली चौलगी कु. देवकते रोहिणी अर्चना पाटील यांनी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ, कु. बिराजदार प्रज्ञा पाटील मुक्तेश्वरी, दुलंगे पुजा ,क्षीरसागर मोहिनी यांनी भाषण दिले. तर गोविंदे मनीषा तर स्वामी अश्विनी यांनी कविता सादर केली. कु. सपना शागालोलू, सुप्रिया जाधव, देवकर रोहिणी, माडीघर जवेरिया, अश्विनी वाघमोडे, पतंगे प्रियंका, माधुरी पवार यांनी सुंदर भित्तीपत्रिका सादर केल्या. कु. अश्विनी गोरे यांनी उदयोगी महिला, कुमारी पाटील मुक्तेश्वरी, विजयकुमार चौगुले व परवेज पटेल यांनी पीपीटी व्हिडीयो सादर केले.डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी स्त्रियांचे योगदान, स्त्री -पुरूष समानता माध्यमामधील स्त्रिया, कुटुंबरचना या अनुषंगाने मार्गदर्शन केले.कु. राजमाने शितल यांनी सर्वांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला

29) दिनांक 31 मार्च 2021 ते 6 एप्रिल 2021 -सत्र 4 मधील आंतरवासिता यादरम्यान घेण्यात आली. सत्र चार चा विद्यार्थी शिक्षकांची पाठ परीक्षा दिनांक 16 एप्रिल 2019 ते 4 एप्रिल 2021 यादरम्यान विद्यापीठ निर्देशानुसार अंतर्गत - बहिस्थ परीक्षकांच्या उपस्थितीत घेण्यात आले.

30) प्रथमवर्षाच्या सत्र एक मध्ये एक आठवड्याच्या आंतरवासितामध्ये शालेयवातावरणाचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी परिसरातील शाळांची निवड केली व शिक्षकांच्या मुलाखती, शालेय परिसराचा अभ्यास हे उपक्रम पूर्ण केले.

३१) 17/4/2021 **महात्मा फुले जयंती** (11/4/2021) -गुलमोहर कुलाच्या वतीने व ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी स्वामी यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राजक्ता वाघचवरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी सद्दाम पटेल, कविता रच्चा, मुक्तेश्वरी पाटील, मोहिनी क्षीरसागर, श्रद्धा खराडे, नाझिया मुजावर, अंजली कल्याणशेट्टी, रोहिणी देवकते, स्नेहल मठे यांनी मांडले. या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रज्ञा बिराजदार यांनी मानले.

३२) दि. २२/०५/२०२१ कोव्हीड - १९ चर्चासत्र- सकाळी १०.०० वाजता या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. डॉ. शिल्पा क्षीरसागर, डॉ. डी. वाय. पाटील मेडीकल कॉलेज पिंपरी, पुणे येथील हजर होत्या. दयानंद कुलाच्या वतीने डॉ. किडगांवकर व्ही. बी. यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या चर्चासत्रात पूजा दुलंगे, दिपाली भांजे, अश्विनी स्वामी, पूजा बिराजदार, योगिनी कोरे, तृप्ती मोरे, सुप्रिया

जाधव, मिनाक्षी कांबळे यांनी कोव्हीड-१९ संदर्भात कोरोना इतिहास, संसर्ग, लक्षणे, सावधगिरी, लस, उपाययोजना, चाचण्या, तिसरी लाट, मानसिक स्थिती या विषयावर चर्चा करण्यात आली. यानंतर प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. शिल्पा क्षीरसागर यांनी झाडापासून मिळणारा ऑक्सिजनाचे महत्त व, प्रयोगशाळेतील चाचण्या, स्वच्छता, लस घेणे या संदर्भाने मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थी शंकांचे निरसन उत्तम केले. यानंतर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी आरोग्य क्षेत्रातील संशोधन, विविध चाचण्या, डॉक्टर स्नुहाचे योगदान इ. संदर्भात मार्गदर्शन केले. जीवनाश्यक चारोळीसह अध्यक्षीय मनोगत पूर्ण केले. या चर्चासत्राचे आभार कु. मिनाक्षी कांबळे यांनी मानले. या चर्चासत्राचे उत्तम सूत्रसंचालन कु. सुप्रिया जाधव यांनी केले. या चर्चासत्रास सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी हजर होते.

३३) दि. २५/०५/२०२१ तंबाखू मुक्ति अभियान शा. शिक्षण व आरोग्य या विषयांतर्गत श्री. रामचंद्र वाघमारे यांचे दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर व सारथी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखू मुक्ति अभियान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात केले. कु. अश्विनी गोरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कु. रूपाली चौलगी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यानंतर प्रमुख वक्ते रामचंद्र वाघमारे यांनी तंबाखू व्यसनमुक्ती जनजागृतीची गरज, तंबाखू इतिहास, त्यातील घटक, विषारी रसायने, तंबाखूसेवन कारणे व उपाय, तंबाखूसेवन कारणे व उपाय, तंबाखू घेण्याचे प्रकार, आजार या मुद्द्याद्वारे स्पष्टीकरण केले व तंबाखू सेवानामुळे आपली सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती कशी होते हे स्पष्ट केले.यानंतर प्राचार्य. डॉ. क्षीरसागर यांनी रोग व काळजी याची दखल घेणे सर्वांना आरोग्यपूर्ण जीवन उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. असे स्पष्ट केले.यानंतर विद्यार्थी परिषद सचिव प्रतिक्षा शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले. यामध्ये पवार सुहास यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

34) **प्रपाठ लेखन :-** सत्र एक, तीन व चार प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रपाठ लेखन घेण्यात आले विद्यार्थ्यांनी प्रपाठा साठी दिलेले प्रश्न व त्याची उत्तरे लिहून संबंधित मार्गदर्शक प्राध्यापकांना व्हाट्सअप किंवा ई-मेलच्या माध्यमातून पाठविले होते. संबंधित प्राध्यापकांनी वेळोवेळी प्रपाठ लेखन तपासून प्रत्याभरण दिले.

35) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संचलित सुट्टीतील बी एड(2019 - 21) चे दिवाळी व उन्हाळा सुट्टीतील संपर्क सत्रातील सर्व कामकाज ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आले. तसेच(2020 - 2022) या नवीन प्रवेशित शिक्षकांचे संपर्क सत्र ही ऑनलाइन पद्धतीनेच घेण्यात येणार आहे.



# मराठी विभाग



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



स्वातंत्र्याचे हक्क भीक मागून मिळत नसतात ते स्वसामर्थ्याने मिळवायचे असतात. देणगी म्हणून ते लाभत नसतात. ते त्रिकालाबाधित महानुभवाचे प्रत्यक्ष पाठ देणारे आणि भारतातील अत्यंत विषारी जातीयतेने हीनदीन अवस्थेत ठेवलेल्या समाजाला आत्मभान देऊन स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखविण्याचे महान कार्य ज्यांनी केले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

मातीत वाढलेल्या मातीत गाडलेल्या, माती खाऊन जन्माची माती झालेल्या, मातीमोल समाजाला मातीमोल स्वरूप प्राप्त करून देणारी प्रकाशज्योत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. अशा थोर महामानवाचा जन्म मध्यप्रदेशातील महू या गावात 14 एप्रिल 1891 मध्ये झाला. त्याचे नाव भीमराव रामजी आंबेडकर.

कोणत्याही देशातील पुरोगामी व सुधारणावादी व्यक्तीला समाजाकडून होणारा छळ सहन करावा लागतो. असा इतिहास आहे. डॉ. आंबेडकरांचे जीवनही यापेक्षा वेगळे नव्हते. म्हशी भादरणाऱ्या न्हाव्याने बाल आंबेडकरांचे केस कापण्यास नकार दिला. हा प्रसंग त्यांनी आपली बहीण तुळशीला सांगितला तेव्हा ती म्हणाली, मग त्यात रडण्यासारखं काय आहे अरे तू लढायला शिक, आपण सारे लढू या नंतर ती कात्री आणते व स्वत:च्या भावाचे केस कापते. अशाप्रकारे बाबासाहेबांच्या मनातील क्रांतीचा स्फुलिंग तयार झाला. असे अनेक अपमानाचे प्रसंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाश्चात्य देशांकडून आल्यावरही पचविले.

ज्याचे पोट दुखते तोच ओवा मागतो अशी एक म्हण आहे. त्याचप्रमाणे अस्पृश्यतेचे प्रखर डंक ज्यांनी सोसले त्यांनाच या अस्पृश्यतेची दाहकता कळणार

म्हणून त्यांनी स्त्री-शुद्रांना गुलाम बनविणाऱ्या मनुस्मृतीचे 25 डिसेंबर 1927 रोजी दहन केले. महाड सत्याग्रहामुळे आंबेडकर हे केवळ ज्ञानी पुरूष नसून राजकारणी पुरूषही आहेत. केवळ विदयाभूषण नसून कृतीशूर नेतेही आहेत, हे सिध्द झाले. काळाराम मंदीर प्रवेशासाठीही त्यांनी पाच वर्षे लढा देऊन यशस्वी केला.

बाबासाहेबांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी मूकनायक बहिष्कृत भारत, समता, जनता अशी वर्तमानपत्रे सुरू केली. त्याचबरोबर त्यांनी प्रॉब्लेम ऑफ रूपी, कास्ट इन इंडिया थॉट्स ऑन पाकिस्तान, हू वेअर द शुद्रास दि अशटचेबल, बुध्द अँड हिज धम्म असे अनेक महत्वपूर्ण ग्रंथ लिहिले म्हणून त्यांच्याविषयी कवी ज.वि. पवार म्हणतात.

तू झालास परिस्थितीवर स्वार

आणि घडविला नवा इतिहास

तू झालास मूक समाजाचा नायक

आणि जागा केलास उभा बहिस्कृत भारत ।

मोडेन पण वाकणार नाही अशा निश्चयी बाणाच्या आंबेडकरांनी दलितांच्या समग्र उध्दारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. व्यक्तीश: पराकोटीचे कष्ट घेऊन अर्थशास्त्रातील, कायदयातील सर्वोच्च अशा पदव्या प्राप्त केल्या. पण स्वत:चे हे यश त्यांनी स्वत:च्या वैयक्तिक उपभोगासाठी वापरले नाही.

उकिरडयावर जन्मास येणे, अस्पृश्य म्हणून आयुष्यास आरंभ करणे, बालपणात महारोग्याप्रमाणे वाळीत टाकण्यात येणे आणि सर्व तारूण्यात समाजापासून झिडकारण्यात येणे, केशकर्तनालये, उपहारगृहे, वसतीगृहे, देवळे, सरकारी कार्यालये यातून पावलोपावली अपमान होऊन दु:ख मिळणे हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कटू अनुभव आहे.

नातलगांचे जेवणाचे डबे नेणे, जगातील प्रसिध्द विद्यापीठातून पुरेशा अन्नाविणा तडफडत अभ्यास करणे, आपले आयुष्य विद्यार्जनासाठी व्यतीत

करणे, पाठीशी कुटुंबाचे धन नाही, राजकारणात राजकीय वारसाचा आधार नाही आणि तरीसुध्दा कट्टर राजकीय विरोधाला आणि संकटांना न जुमानता देशाच्या प्रथम श्रेणीच्या पुरूषात लौकीक मिळवणारा व पददलितांना शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असं सांगणारा.

काय सांगू तुम्हाला भीम माझा कसा होता

सप्त ठिगळांच्या बेडीचा भीम माझा खिसा होता.

रक्ताच्या शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निर्धार केला पाहिजे हा विचार व्यक्त करणारे आंबेडकर प्रखर राष्ट्रभक्त होते. आज जर आपल्या भारत देशाला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती म्हणजे जनतेच्या मनात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. ते म्हणत, आपण प्रथम भारतीय आणि नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी व कानडी आहोत अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमत: भारतीय व नंतरही भारतीय आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे. याहून देशभक्तीचे व एकात्म भावनेच्या राष्ट्राभिमानाने भरलेले एवढे ज्वलंत मन दुसरे कोणते असू शकेल?

आज आपल्या देशात विविधतेतही एकता असून लोकशाही टिकली आहे याचे महत्वाचे कारण आपली राज्यघटना हे आहे व त्याचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

ज्यामुळे जगात भारताला मान आहे

उभ्या जगात एकमेव घटना आहे

जिला जगात पहिला मान आहे

हे तर माझ्या बाबांचे संविधान आहे.

जगात एक महासत्ता म्हणून उदयाला येत असलेल्या भारताच्या कामगिरीत शिक्षणाचे खूप महत्व असणार आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि ते

पिल्यावर कोणताही मनुष्य गुरगुरल्याशिवाय राहत नाही हा विचार डॉ. आंबेडकरांनीच दिला आहे. आपली सुधारणा आपणच केली पाहिजे असा मुलगामी विचार सांगणारा असा हा मानवाच्या प्रतिष्ठेसाठी लढणारा एक योध्दा आणि पददलितांचा व्राता होता. आणि वैज्ञानिक सत्यावर आधारलेला, मानवतावाद शिकणारा बौध्द धर्म स्वीकारायला लावून लक्षावधी पददलितांना धुळीतून धवलतेकडे आणि तृण वृत्तेकडून तेजाकडे नेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर युगाचे महान शिल्पकार आहेत.

आयुष्यभर दलितांच्या हक्कासाठी झगडणाऱ्या अशा या महामानवाने 6 डिसेंबर 1956 साली या जगाचा निरोप घेतला. 1990 मध्ये कृतज्ञतापूर्वक मरणोत्तर त्यांना सर्वोच्च भारतरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. आजही त्यांचे विचार आणि जीवन आपणास प्रेरणा देत आहे आणि देत राहील.

हे युगदृष्टया

तूच झालास सूर्य आमचा

विषाचे अमृत करताना

चंदनदेह झिजविल्यास तरीही

हे घटनेच्या शिल्पकारा

अक्षयसूर्या

तुझ्या तेजातून निर्माण होणाऱ्या

उदयाच्या क्रांतीसूर्याला प्रणाम

प्रणाम माझा, हे थोर पुरूषा, प्रणाम

जय- भिम।



- मोरे तृप्ती
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20226

# तंबाखूचे दुष्परिणाम




भारत एक विकसनशील देश आहे. जगाच्या पाठीवर भारत प्रत्येक गोष्टीत अग्रेसर आहे. सर्वात जास्त तरूणवर्ग भारतात आहेत. पण हाच तरूणवर्ग व्यसनाच्या विळख्यात अडकलाय. जगात तंबाखूचे उत्पादन घेण्यात चीननंतर दुसरा क्रमांक भारताचा लागतो. कारण आपल्या देशात तंबाखूसेवन करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. युवापिढी व्यसनाने अखंड बुडालेली आहे. ही खूप मोठी शोकांतिका आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने WHO तंबाखूला जागतिक समस्या म्हणून घोषित केले आहे. जगामध्ये प्रत्येक वर्षी तंबाखूच्या आजाराने पन्नास लक्ष लोक मरतात. तंबाखूच्या वापरामुळे हृदयरोग, फुप्फुसांचे आजार तसेच इतर असंसर्गजन्य रोग होतात. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात तंबाखू खाणाऱ्यांची संख्या फार मोठया आढळून येते. पुरूषमंडळी तर सोडाच त्याठिकाणी लहान मुले आणि स्त्रीयासुध्दा तंबाखूच्या आहारी गेलेली दिसून येतात. विडी, सिगारेट, गुटखा अशा विविध माध्यमातून व्यक्ती तंबाखूचा वापर करत असतो.

ज्याप्रमाणे चहा पिल्यामुळे मनाला तरतरी मिळते असे वाटते माइंडफ्रेश होते. बुध्दीला चालना मिळते डोकं चालायला लागते, अशा लोकांमध्ये गैरसमज पसरलेला आहे. तंबाखू खाण्याचे समर्थन व्यक्त करणारी मंडळी तंबाखू सेवनाने काहीही होत नाही. कोणताच आजार होत नाही असे सांगतात. आमचे आजोबा तंबाखू खात होते. परंतु ते वयाच्या ऐंशीव्या वर्षी नैसर्गिकपणे वारले असे घरातील

उदाहरण देऊन पटवून सांगतात.  त्यास्तव कधीकधी अशा बोलण्यावर विश्वास टाकला जातो, परंतु तंबाखू सेवनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच गेले तर मात्र अति तेथे माती या म्हणीप्रमाणे आपल्या जीवनाचीसुध्दा माती झाल्याशिवाय राहणार नाही, हेही तेवढेच खरे आहे, म्हणून तंबाखू खाणे किंवा सिगारेट, विडी पिण्याची सवय आपणास लागू नये याची प्रथम काळजी घेणे अत्यंत महत्वाची आहे. वास्तविक तंबाखूचे सेवन करणे ही वाईट सवय आहे. सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना कामाच्या ठिकाणी आणि घरातील सदस्यांजवळ धूम्रपान केल्यास त्याच्यातील विषारी रासायनिक  घटकांमुळे कर्करोग होण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तंबाखू सेवनामुळे हृदयविकार, फुप्फुसाचे कर्करोग, क्षयरोग, स्ट्रोक, श्वसन संस्थांचे आजार होतात यापैकी 40 टक्के आजार हे धुम्रपानाशी  संबंधित आहेत. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम माहित असतानाही आजही भारतात 24.3 टक्के भारतीय पुरूष आणि 2.9 टक्के महिला तंबाखू सेवन करीत आहेत.

प्रत्येक वर्षी 1 जानेवारी हा ध्रूमपान विरोधी दिन म्हणून पाळला जातो. गेल्या कित्येक  वर्षापासून तंबाखू भारतीय माणसाच्या जगण्याशी, संस्कृतीशी जुळलेली आहे. जर या तंबाखूचे  दुष्परिणाम  रोखायचे, थांबवायचे असतील तर सर्वांनी मिळून तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा करूया. आजच्या युवापिढीला व्यसनमुक्त करूया आणि आजचा, उदयाचा भारत व्यसनमुक्त करूया..

तंबाखू  मुक्तीची शपथ

तंबाखू, गुटखा आणि ध्रुमपान हयांच्या

दुष्परिणामांची मला जाणीव आहे,

आणि मी हया व्यसनांपासून दूर राहण्याची शपथ घेत आहे.

माझे घर आणि माझ्या आजूबाजूच्या परिसर हादेखील तंबाखूमुक्त रहावा हयासाठी मी प्रयत्न करणार आहे.

भारत शासनाचा तंबाखू नियंत्रण कायदा, माझ्या परिसरात, कार्यस्थळी लागू करण्यासाठी मी तत्परतेने पुढाकार घेणार आहे.

मी माझ्या वचनांचे पालन आजन्म करेन आणि माझा महाराष्ट्र व माझा देश

तंबाखूमुक्त करेन.
चला व्यसनमुक्त होऊ
सुखी जीवनाचा ध्यास घेऊ
सोडून ध्रुमपान अन तंबाखू
निरोगी मोकळा श्वास घेऊ.

- जाधव सुप्रिया
- बी.एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20251



# पंढरपूरची खादय संस्कृती



डॉक्टर असं म्हणतात की, जगण्यासाठी खाव पण मी म्हणते की, माणसानं खाण्यासाठी जगावं ॥ कारण या जगात इतके सुंदर आणि चविष्ट पदार्थ आहेत की, रोज एकाची चव चाखायची म्हटलं तर आयुष्य पुरणार नाही. देवानं इतकी सुंदर सृष्टी करून ठेवलीय आणि त्यात इतके ओठावर अधिराज्य गाजविणारे पदार्थ आहेत मग लोक आत्महत्या का करतात हेच मला कळत नाही.

प्रत्येक शहराची विशिष्ट अशी एक खादय संस्कृती असते, आणि जर चांगलं खायचं असेल तर पायपीट ही करावीच लागते. गावात कुठं काय चांगलं खायला मिळतं हे फिरल्याशिवाय कळत नाही. त्याचप्रमाणे पंढरपूरलासुध्दा एक पूर्वापार चालत आलेली प्रसिध्द खाण्याची परंपरा आहे. तसेच ती साऱ्या महाराष्ट्रात विख्यात आहे.

पंढरपूरात काय विशिष्ट खाऊ गल्ली नाहीये. पण काही अशी ठिकाणं आहेत की भलेही ती स्वच्छ नसतील पण खवय्यांच्या दृष्टीने ती मंदीर आणि स्वर्गीय ठिकाणे आहेत. दिवसाची सुरूवात आपण चहाने करतो आणि पंढरपुरात चहा प्यायचा असेल तर फक्त स्पेशल गोल्डन टी हाऊस. गणपुलेंच्या या हॉटेलमधून तसंच खाली शिवाजी चौकात आलात तर तोपर्यंत नाष्टयाची वेळ झालेली असतेच. लगेच डाव्या बाजूला असलेल्या रेणूका ईडली गृहात शिरायचं इथली इडली चटणी म्हणजे स्वर्ग इडलीपेक्षा इथली पांढरी चटणी भारी असते.

पंढरपुरात इडली आणि सर्वोत्कृष्ट इडली मिळण्याची चार ठिकां आहेत. वर सांगितल्याप्रमाणे रेणूका इडली गृह- दुसरं म्हणजे गजानन महाराज मठाच्या

तिथला आण्णाचा इडलीचा गाडा. इथले उडीद वडे प्रसिध्द आहेत. त्याबरोबर सांबर आणि लालचटणी. दोन प्लेट जर खाल्ल्या तर जेवणाची पण गरज नाही. तिसरे ठिकाण म्हणजे उध्दव घाटावरचं उडपी हॉटेल आणि महाव्दार चौकातला एक गाडा. पण फक्त इडलीच चांगली मिळते असं नाही.

नाष्टयासाठी खूप पर्याय पंढरपुरात उपलब्ध आहेत विठ्ठल मंदीराजवळच्या डाव्या बोळातून जर सरळ आत चालत गेलात तर एका घराच्यासमोर एक स्टँड उभा केलेले दिसेल त्या घरात बिनधास्त शिरायचं ते घर म्हणजे बारसकर वडेवाले। सकाळी आठ वाजल्यापासून तिथं बटाटे वडे मिळायला सुरूवात होते आणि 11 ला संपतात पण. अनेक पंढरपूरकरांचा नाष्टा हा बारसकरचे वडे आणि लोणी असा आहे. पाच सहा वडे खाल्लेत तर जेवायची गरजच नाही. पण आपण दोनच्या वर जायचं नाही कारण पुढे अनेक गोष्टी आहेत.

याशिवाय गजानन महाराज मठाजवळची पुरीभाजी, मंडईत मिळणारे उप्पीट, महाराजा बेकरीचा समोसा, कचोरी, आणि ढोकळा हया डिशेससुध्दा आहेतच. हे झालं नाष्टयाचं. नाष्टा करेपर्यंत जेवणाची वेळ झालेली असतेच. पंढरपूरात दुपारचं जेवण उत्कृष्ट मिळण्याचं ठिकाण म्हणजे गणपुलेंची ब्राम्हणांची खानावळ स्थळ स्टेशन रोड पंढरपुर. याशिवाय इतर अनेक उपहारगृहसुध्दा आहेत. दुपारच्या जेवणानंतर झोप तर हवीच. एक निवांत तास दिड तासाची झोप काढल्यानंतर पुढच्या पदार्थांचा आस्वाद घ्यायला आपण मोकळे.

परत चारच्या सुमारास अमृततुल्या या कडक कटींग चहा घेऊन फ्रेश झालं की मोर्चा वळवायचा टिळक स्मारक मंदीरच्या मैदानावर म्हणजेच चौपाटीवर. इथं अनेक राजस्थानी लोकांचे गाडे उभारलेले असतात. इथली भेळ, भेळपुरी, शेवपुरी, दहीपुरी, कचोरी खूप चविष्ट असते. तसेच मैदानात प्रवेश करतांनाच दोन्ही बाजूला उभे असलेल्या पाणीपुरीच्या गाडीवर, उभा राहूनच पाणीपुरी खावी. याशिवाय उध्दव घाटावर अण्णा आदमिलेंची भेळ, आणि पावचटणी, तसेच बेकटस्वामी मठाजवळची काटेंची भेळ, शिवाजी चौकातल्या भोलेनाथ मधली पावभाजी आणि दाबेली, अन्नपूर्णाची पुणेरी भेळ, शिवाजी चौकातला रगडा पाव, गजानन महाराज मठाजवळचा नंदूचा वडापाव, गजानन महाराज जवळची भेळ, हया ठिकाणांनी पंढरपुरकरांच खादयजीवन अतिशय समृध्द केले आहे.

संध्याकाळच्या जेवणासाठी राधेश, न्यू राधेश, सवेरा, रसोई, कृष्णा, टेमटेशन हे अनेक ऑप्शन्स उपलब्ध असतात. रात्रीचं जेवण झाल्यानंतर मात्र पान हे हवंच। आणि ते चौफाळयातल्या गणेशचं मसाले पानचं।

जर संध्याकाळी आईस्क्रीमचा आस्वाद घ्यायचा असेल तर अन्नपूर्णा इथली बाजीराव मस्तानी, कसाटा आणि मिक्स आईस्क्रीम तसेच भोलनाथचं मँगो आईस्क्रीम आणि मावा मस्तानी। व्वा, दिल खुश होऊन जातं.

तसेच देशपांडेचे पेढे, संतपेठेतील साईनाथ लस्सी, संध्याकाळी चौफाळयात, आणि शिवाजी चौकात मिळणारे मसाला दूध तसेच दुध बासुदीं मिक्स, तिथलीच मावा कुल्फी मानेंची आल्याची वडी हे आणि असे अनेक पदार्थ आहेत.

आपण एखादा लग्नसोहळा चांगला झाला हे कधी म्हणतो तर त्यातल्या जेवणावरून । पंढरपूरासारखं लग्नातलं जेवण कुठचं मिळत नाही हं। स्वानुभव आणि दुसऱ्यांचा अनुभव आहे.

पूर्वी पंढरपूरात जेवणाच्या पंगतीच्या पंगती उठायच्या. त्यातला मेनू म्हणजे पेंडपाला, चपाती, श्रीखंड, बटाटयाची भाजी, चटणी, कोशींबीर, भात वरण, तूप, मसाले भात असा असायचा आजही आहे. त्यात सर्वात महत्वाचा असायचा तो घरच्या सारख आग्रह. यावरून पंढरपूरचा पाहुणचार कळून यायचा.

अशी ही पंढरपूरची समृध्द खादय परंपरा आहे. यातलं काही राहीलं असेल तर जरूर मला सांगा. नक्कीच मी तिथला आस्वाद घेईन आणि तुम्हीही घ्या. शेवटी एवढंच सांगेन

वदनी कवळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे
सहज हवन होते, नाम घेता पुकाचे
जीवन करी जिवित्वा, अन्न हे पूर्णब्रम्ह
उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म

हे एक यज्ञकर्म आहे, ते नीटचं झालं पाहिजे आस्वाद घेत राहीलं पाहिजे. खाण्यासाठी जन्म आपुला.....



- मोरे तृप्ती
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20226

# दृष्टीकोन



एका गावात एक गरीब कुटुंब राहत होतं. घरात पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले राहत होते. त्या मुलांचे वडील कोणतेही काम करत नसे. केवळ दारू पिऊन फिरणे आणि घरी येऊन पत्नीला व मुलांना मारहाण करत असे. परिस्थिती गरीब असल्यामुळे आणि पती काम करत नाही म्हणून त्या मुलांची आई दुसऱ्यांच्या शेतात कामाला जात असे. शेतात काम करून ती माऊली घर चालवतं असे. आणि तसेच मुलांना तिनं शिक्षणही दिले असेच कष्टाचे बरेच दिवस, त्या कुटुंबाने काढले.

आता या माऊलीची दोन्ही मुलं मोठी झाली होती. खूप दारू पिल्याने तिच्या पतीचे मृत्यु झाले. काही दिवसानंतर तिने दोन्ही मुलाचे लग्न केले. परंतु अल्पशा आजारामुळे तिने जगाचा निरोप घेतला. ती मुले आता अनाथ झाली होती. आई आणि वडील दोघेही त्यांच्यासोबत नव्हते.

काही दिवसानंतर त्या दोन भावांपैकी एका भावाला अंमली पदार्थांचे व्यसन लागले. तो दारू पिऊन येत होता आणि कुटुंबियांना मारहाणही करत होता. इकडे दुसरा भाऊ यशस्वी उदयोजक होता, त्याला समाजात मान आईवडीलांची दोन मुलं, एकाच वातावरणात वाढलेली, पण इतकी वेगळी कशी, असा प्रश्न काही लोकांना पडला.

एके दिवशी एक गृहस्थ त्या दारू पिणाऱ्या भावाला विचारलं, तू असा का वागतोस ? तू अंमली पदार्थांचे व्यसन करतो तू दारू पितोस आणि तू तुझ्या कुटुंबियांना मारहाण करतोस. कुटुंबियांना किती त्रास होतो तुला कळत नाही का? त्यानंतर तो म्हणाला, माझ्या वडीलांमुळे मी असा वागतो. ते गृहस्थ विचारले,

तुझ्या वडीलांना अंमली पदार्थांचे व्यसन होते, ते दारू पिऊन येत होते आणि आम्हाला मारत असे. मग माझ्याकडून तुम्ही काय अपेक्षा करणार? म्हणून मी असा आहे.

तोच गृहस्थ प्रश्न दुसऱ्या उदयोजक भावाला विचारतो, तू इतकं व्यवस्थित का व कसे वागतो त्याने उत्तर दिलं की, माझ्या वडीलांमुळे मी असा वागतो. यानेही तेच उत्तर दिले जे त्याच्या दारू पिणाऱ्या भावाने दिले होते. त्यावर गृहस्थ विचारले, ते कसे काय तो म्हणाला, ते दारू पिऊन आम्हाला मारत असे. मी लहानपणीच पक्क ठरवलं की आपण असं कधीही वागायचं नाही, दोघेही एकाच गोष्टीतून विचार घेत होते आणि त्याप्रकारे वागत होते. पण एक सकारात्मक दृष्टीकोनातून तर दुसरा नकारात्मक दृष्टीकोनातून.

-रोहिणी देवकते
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20203



# रचले मनी मनोरे, खचले चिरे तयांचे



पडदा उघडतो, रंगभूमीवर कुणीच नाही इतक्यात
होत्या किती उमेदी
परि हेचि व्हावयाचे
तूचले मनी मनोरे
खचले चिरे तयांचे

ही कवी राजा बदे यांची  कविता गात दुर्मुखलेल्या चेहऱ्याने पाच कथित सुशिक्षित बेकार तरूण प्रवेश करतात. हळूहळू कवितेचे बोल क्षीण होत जातात. सर्व तरूण दु:खी चेहरे करून ओळीने उभे राहतात.

- सगळे तरूण – आम्ही सुशिक्षित बेकार आहोत,या समाजातले, या देशातले।
- पाचवा- आमच्या अवतारावरून तुम्ही हे ओळखलं असेल.
- पहिला- महाविद्यालयाच्या सोनेरी घरटयातून गेली दहा वर्ष बाहेर पडलोय. पण सी. एच. बी. पार्टटाईम ही अडथळयांची शर्यत खेळत, अखेर सुशिक्षित बेकार म्हणून फिरत आहे.
- दुसरा- अरे, तुला दहा वर्ष झाली असतील, मला तर बारा वर्ष झाली आहेत. काम शोधणं हेच एक काम बनलं आहे.
- तिसरा- अरे,हे दहा अन् बारा  काय चाललयं? माझ्या वडीलांनी तर पाच एकर जमीन विकून नोकरीसाठी पाच लाख रूपये भरले पाच लाख रूपये भरले पाच वर्ष झाली. त्या हायस्कूलला शासनाची मान्यताच नाही. पाच वर्ष फुकटात अध्यापन केले, पण त्यांना दुसरा सात लाख देणारा बकरा सापडला

अन् मला किरकोळ कारणावरून काढून टाकले, आता दिलेल्या पैशासाठी खेटे घालतोय.

- चौथा-अरे तुम्ही फक्त एम. ए. बी. एड. झालात मी तर एम. फील. पीएचडी. केलंय.
- पाचवा- अरे एम फील. पीएच.डी चे काय घेऊन बसलाय मी तर सेट पास झालोय मलासुध्दा नोकरीसाठी सात लाख रूपये मागतात.
- पहिला- मी बेकार, तू बेकार।
- चौथा- आपण सर्वजण बेकार आहोतच, पण उदया शिकून बाहेर पडणारेही आपल्यातचं सामील होणार आहेत.
- पाचवा- असं बोलू नकां रे माझं हृदय चिरलं जातंय। रक्त भिसरण सतरावेळा थांबतंय। भावनेचा गोठून बर्फ होतोय।
- चौथा- आमच्या मनात काय आनंदाच्या बाग फुलत आहेत?
- तिसरा- प्रत्येक सकाळ हृदयाचा लतका तोडत असताना प्रत्येक दिवस निवडुंगासारखा फरफरत जात असताना, हे बाग फुलण्याचं काय बोलत आहात?
- दुसरा- अरे, हे काय बोलतात, हे तुला समजतय?
- पहिला- मला तर काहीच सूचत नाही रे
- पाचवा- असं काय झलं न सुचायला?
- पहिला- खरं सांगू, मी नको नको म्हणत असताना आईवडीलांनी माझं लग्न केलं, मला त्वरीत नोकरी मिळेल म्हणून पण कशाचं काय माझी अवस्था पुरात पाय अंतराळी अशी झालीय.
- पाचवा- पुरात पाय अंतराळी
- पहिला- होय, पुरात पाय अंतराळी घरातून पत्नीची सारखी भूणभूण चालू आहे. कधी नोकरी लागणार म्हणून तेरी दो टक्कोयाकी नोकरी मेरी लाखो का सावन जाक अशी ती म्हणत आहे काय करू काहीही सूचत नाही.
- पाचवा- घाबरू नकोस मित्रा असाच हा खास तोकडा पुन्हा पुन्हा घरायचा अन् असाच जन्म फाटका पुन्हा पुन्हा घरायचा अन् असाच जन्म फाटका पुन्हा पुन्हा शिवायचा.
- तिसरा- बरोबर आहे मित्रा तुझं

  नाव कागज की

गॅहरा है पानी
यही है जिंदगी की कहानी
फिर हात में मुस्कुराके
दुनियादारी पडेगी निभानी।

- दुसरा- वा। शासनाचा जीवघेण्या धोरणानं, बेकारीनं सर्व सुशिक्षितांच जीव चाललय अन् तुम्हाला कविता आणि गाणी सुचू लागलीत
- तिसरा-काय करावं म्हणतोस ? काळजी करून फास घेऊन मरावं म्हणतोस?

- पहिला – तुझं बरोबर आहे या समस्येची, दु:खाची कळ आतल्या उरात मिळून जगाबरोबर तसचं पहिजे अन् यातून मार्ग काढला पाहिजे.

( तिथूनच चाललेला एक सद्गृहस्थ हा संवाद ऐकतो. )

- सदगृहस्थ- कशाबद्दल मार्ग पाहिजे.

सगळे- हे तुला आमच्या अवतारावरून कळत नाही.

- पहिला- पोट भरलेल्यांना, कानानं बहिऱ्या अन् मनानं आंधळया असलेल्यांना कस कळणार ?
- सद्गगृहस्थ- धीर धरा थोडयाच अवधीत तुम्हा सर्वांना मोठया पगाराच्या नोकऱ्या मिळतील.
- पाचवा- तुझ्याजवळ अन् भारत सरकारजवळ जादूची कांडी आहे की काय?
- चौथा- गेली दहा बारा वर्षे झाली, आमची हवा जात आहे चढत नाही अशी अवस्था झालीय.
- तिसरा- हा म्हणतोय मोठया पगाराच्या नोकऱ्या मिळतील.
- पाचवा- गेले तीन दिवस झाले, पोटात अन्नाचा कण नाही अन् म्हणे मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील.
- दुसरा- खरं सांगू? रिकाम्या पोटी वैभवाच्या गोष्टी निरर्थक असतात.
- पाचवा- अरे, तुझं हे तंतोतंत बरोबर आहे.
- सद्गृहस्थ- रिकाम्या पोटी वैभवाच्या गोष्टी निरर्थक असल्या तरी ही रिकामी पोटंच कती करतात.
- पाचवा- क्रांती करतात. ?
- चौथा- क्रांती करतात. ?

- सद्गृहस्थ-हो हो क्रांतीच करतात खरं सांगायचं म्हणजे संतापलेल्या माणसाला सांगावही लागत नाही त्याला सुचतं आपोआप।
- पाचवा – सुचत आपोआप
- सद्गृहस्थ – हो हो सुचतं आपोआप बेकारग्रस्त बंधूनो। आज या देशात फक्त बेकारी हीच समस्या नाही तर दहशतवाद, वाढती महागाई, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, हुंडाबळी, प्रांतवाद, जातीवाद, जातियता, धर्मांधता, ढासळते, पर्यावरण, व्यसनाधिनता , सज्जनांचा पलायनवाद इ. समस्यांनीही ग्रासले आहे.
- चौथा- आपण काय बोलताय हे मला काही कळत नाही.
- सद्गृहस्थ – कळत नाही रे। अनेकांना कळत नाही।किती सामर्थ्य तुमच्या मेंदूत आहे दडलेलं ते ? खरं सांगू देश म्हणजे डोंगर, दऱ्या पर्वत, धरणं व उंच इमारती नव्हते. देश म्हणजे देशातील माणसं त्या माणसानं योग्य दिशा देऊन त्यांना विधायक कार्य करण्यास प्रवृत्त करणे हे महतकार्य तुम्हा सर्व युवकांना करायचं आहे.
- तिसरा- हे देशान करायचं आहे आम्ही का कराव?
- सद्गृहस्थ – अरे, हे आम्ही अन् तुम्ही काय चालवलयं? लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांच्यासाठी, लोकांकडून चालवलेलं राज्य. लोक म्हणजे तुम्हीच आहात तुम्ही तुमच्या विधायक शक्तीचा उपयोग करून कृतिशील, उपक्रमशील सज्जनांचं सरकार सत्तेवर आणा म्हणजे सर्व प्रश्न सुटतील.
- चौथा – हे आम्हाला कधी कळेल?
- सद्गृहस्थ – तुमची इच्छा जागी झाल्यावर इच्छा जागी होईल तोच खरा तुमच्या शिक्षणाचा आरंभ असेल. तुम्ही फक्त बोलता,विचार करता पण कृती करीत नाही. फक्त कोलाहय करता अन् खालीलप्रमाणे रडगाणे गात राहता.

  होत्या किती उमेदी<br>
  परि हेचि व्हावयाचे<br>
  रचले मनी मनोरे<br>
  खचले चिरे तयांचे

  सर्व तरूण गंभीर होऊन होकारात्मक माना हलवतात अन् पडदा पडतो.

- पवार माधुरी
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं . 20244



# अणुकेंद्रकाचा शोध






Rutherford

(१८७२-१९३७)

अणुकेंद्रक म्हणजे काय तुम्हाला माहित आहे काय ? अणु म्हणजे सर्व द्रव्यात आढळणारी अतिसूक्ष्म संरचना होय .रासायनिक मूलद्रव्याच्या लहानात लहान कणास 'अणू' असे म्हणतात. कोणताही पदार्थ हा अति सूक्ष्म कणांनी बनलेला असतो ही संकल्पना प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ ' कणाद ' यांनी मांडली होती. अणु हे तीन प्रकारच्या कणांनी बनलेले असते.

१)इलेक्ट्रॉन (ऋण प्रभारित कण)

२) प्रोटॉन (धन प्रभारित कण)

३) न्यूट्रॉन( उदासीन कण, कोणतेही भार नसलेले)

मित्रांनो, अणुकेंद्रकाचा शोध कसा लागला हे आपण जाणून घेऊया, आधुनिक भौतिकशास्त्राचे जनक 'अर्नेस्ट रुदरफोर्ड' (१८७२-१९३७) .त्यांच्या एका साध्या प्रयोगाने त्यांनी अणुकेंद्रकाचे अस्तित्व सिद्ध केले. रुदरफोर्ड यांनी सोन्यापासून पातळ पत्रा तयार केला, आणि त्या पत्र्यावर अल्फा कणांचा मारा करायला सुरुवात केली. या प्रयोगात त्यांना असे आढळून आले की काही अल्फा

कण सोन्याच्या पत्र्यापासून सरळ मागे फिरून आले , तर काही फार मोठ्याकोनातून ,विचलित (रिफ्लेक्ट) झाले. आणि काही अल्फा कण मात्र आरपार निघून जातात.

अल्फा कण धन विद्युतभारित असल्याने त्यांना त्यांच्या मार्गापासून विचलित करणारी वस्तूसुध्दा विद्युतभारितच असली पाहिजे .त्यामुळेच अल्फा कण आणि ती वस्तू यांच्यात अपसरणाचे बल किंवा (रिपल्सिव्ह फॉर्स) निर्माण होत असले पाहिजे. ती वस्तू म्हणजे अणुकेंद्रक असले पाहिजे, असा त्यांनी निष्कर्ष काढला. पुढे अणुकेंद्रकात प्रोटॉन आणि न्यूट्रॉन असल्याचे निश्चित झाले. प्रोटॉन कणावर धन विद्युतभार असतो आणि न्यूट्रॉन कणावर विद्युत भार नसतो. अर्थातच अणुकेंद्र हे धन विद्युतभारित असते. व त्यामुळेच अल्फा कणावर अपसरणाचे बल निर्माण करते, "म्हणून केंद्रकात जेवढे प्रोटॉन कण जास्त तेवढा त्यावरील विद्युत भार अधिक".

पण अणुकेंद्र कसा स्थिर राहत असेल? अणुकेंद्रकामध्ये असलेले प्रोटॉन एकमेकावर अपसरणाचे बल निर्माण करतील, आणि अणुकेंद्रक फुटून जाईल. पण अणू केंद्र भंग न पाहता अतिशय स्थिर असते. याचे कारण काय असेल? प्रोटॉन आणि न्यूट्रॉन परस्परांना कोणत्या बलाने घट्ट धरून ठेवतात? याचा अर्थ असा की त्यांच्यामध्ये अपकर्षणाऐवजी आकर्षणाचे बल होत असले पाहिजेत. या बलाला ' स्ट्रॉंग फॉर्स ' किंवा ' सशक्त बल ' असेही नाव देण्यात आले. मात्र या बलाची मर्यादा अतिशय कमी असते १०^-१५ मीटर अंतराच्या आत या बलाचा प्रभाव संपुष्टात येतो. याचा अर्थ असा की जर न्यूट्रॉन आणि पोट प्रोटोन मधील अंतर १०^-१५ मीटरपेक्षा जास्त झाले तर, त्यांच्यात असलेला सशक्त बलाचा प्रभाव संपुष्टात येईल. प्रारंभीच्या मुलद्रव्यामध्ये अणुकेंद्रकातील प्रोटॉन आणि न्यूट्रॉन कणांची संख्या जवळजवळ सारखीच असते. पण जसा जसा अनुक्रमांक वाढत जाईल, तस-तशी न्यूट्रॉन कणांची संख्या प्रोटॉन पेक्षा जास्त होते. उदाहरणार्थ कार्बन मध्ये 6 प्रोटॉन आणि 6 न्यूट्रॉन्स असतात.

महत्त्वाची गोष्ट अशी की,अणुकेंद्राचा पृष्ठभाग रेखीव  नसतो . कित्येक अणुकेंद्रे गोलाकृती असतात ,पण काही अणुकेंद्राचा आकार दिर्घवर्तुळाकृती असतो.

सामान्यतः अतिशय जड मूलद्रव्ये किरणोत्सर्गी असतात व त्यांचा  राृहस होत राहतो,पण बहुतांश मूलद्रव्ये  स्थिर असतात .परंतु त्यांना कृत्रिमरीत्याही किरणोत्सर्गी बनवता येते. उदाहरणार्थ, बोरॉन  या  मुलद्रव्या वर अल्फा किरणांचा मारा केला की, ते किरणोत्सर्गी बनते.काही मिनिटातच  या किरणोत्सर्गी बोरॉन चा ह्रास  होऊन त्याचे कार्बन मध्ये रूपांतर होते.  स्थिर मूलद्रव्य किरणोत्सर्गी करण्याच्या क्रियेला 'आर्टिफिशल रेडिओ ऍक्टिव्हिटी' असे नाव आहे. अशा मूलद्रव्यांचा वैद्यकीय उपचारासाठी उपयोग केला जातो.

मनिषा गोविंदे

बीएड -प्रथम वर्ष

रो. नं. 20240



# 'एक होता कार्व्हर' वीणा गवाणकर (पुस्तक परिक्षण)




जगाच्या पाठीवर जगणाऱ्या प्रत्येकास जसं हवं तसं जगायला मिळतं का?. आणि ज्यांना मिळतात त्यांना त्याची किंमत आहे का?. 'दात आहेत तर चणे नाहीत आणि चणे आहेत तर दात नाहीत' याच प्रमाणे सर्वांच्या आयुष्यात काहीना काही विरोधाभास किंवा कमतरता ही असतेच. काही लोक म्हणतील यालाच तर आयुष्य म्हणतात ना?.. हो अगदी खर आहे.. पण हेच जर मानव निर्मित असेल तर?. माणसानेच दुसऱ्यास जखडून ठेवायचा प्रयत्न केला असेल तर?. आपणच जर लोकांना कमी लेखत असेल तर?. असे अनेक प्रश्न, विविध विचार आणि नवनवीन दृष्टिकोनातून आपल्याला विचार करायला लावणार हे पुस्तक आहे.

वीणा गवाणकर यांनी लिहिलेला 'एक होता कार्व्हर' या पुस्तकात अगदी आपल्याला आपला आतला आवाज ऐकू येत राहतो. सतत जगातील कटू सत्याची जाणीव किंवा दर्शन देत राहतो. लेखिकेने पुस्तकास नक्कीच आवर्जून उच्च स्तरावर नेलेले आहे. लिखाण इतके उत्कृष्ट आहे आणि त्यांनी पुस्तकाचा मूळ गाभा आवर्जून खुलवण्याचा प्रयत्न सफल करून दाखवला आहे. मी म्हणेन लेखिका नक्कीच पुस्तकास न्याय मिळवून देतात.

एक अमेरिकी निग्रो माणूस, ज्याचा जन्म खरं तर गुलाम बनून लोकांची सेवा करण्यासाठी झाला होता, त्याने स्वबळावर आपल्या जिज्ञासू वृत्तीने, चिकाटी दाखवून सगळ्यांना अवाक करणारा काही गोष्टी केल्या याची कौतुकास्पद गोष्ट

म्हणजे हे पुस्तक आहे. आणि फक्त एकच नाहीतर सर्व क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामांची यादी आपल्याला निशब्द करुन टाकते. वर्णभेद हा त्या काळातील अमेरिकन लोकांमधील एक खूप मोठा आणि लाजिरवाणा प्रकार होता. कृष्णवर्णीय लोकांना तिथं खालचा दर्जा दिला जात असे, अशातच एक लहानशा मुलाचा, डोळे विस्फारून टाकणारा सोम्य लढा, ह्दयात बराच खोल घाव करून जातो. नशिबात लिहिलेलं सगळं आपण बदलू शकतो, आपण आपलं स्वतःच जीवन हवं तसं जगू शकतो, याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे 'जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर'. त्यांच्या जीवनातील अनेक पैलूंचे दर्शन लेखिकेने करून दिले आहे.

हे पुस्तक आपल्याला जगायला शिकवेल, जीवन आत्मज्ञानानं सजवायला शिकवेल, हसत खेळत रंगवायला शिकवेल आणि त्याचा आनंद अगदी मोठ्या मनाने लुटायला तर शिकवेलच पण त्याहूनही तो दुसऱ्यांच्या वाट्यालाही यावा यासाठी लढायलाही शिकवेल. मला वाटतं सर्वांनी नक्कीच वाचावं असं हे पुस्तक आहे. पुस्तकाच्या मागील मुद्दा मनात एक हुरहुर नक्कीच लावण्यात यशस्वी होतो असं म्हणावं लागेल. आधिकाधिक उपभोगाच्या हव्यासामुळे एका विचित्र वळणावर सारी मानवजात येऊन ठेपली आहे. आता आपल्या सर्वांपुढे केवळ दोनच पर्याय उरलेले आहेत. नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करणाऱ्या आजवरच्या या आत्मघातकी मार्गावर हताशपणे वाटचाल करायची किंवा मागे फिरून कार्व्हर यांनी दाखवलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा संवर्धन, विकास, उपयोग आणि पुनर्भरण या शाश्वत कृषी संस्कृतीचा स्वीकार करायचा. भावी पिढ्यांच्या सुख समृद्धीचा पाया घालायचा असेल तर प्रत्येक सुजाण नागरिकाने वाचायलाच हवे असे हे पुस्तक आहे.



-रोहिणी देवकते
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20203

# मराठी भाषेची सक्ती



मराठी भाषेची सक्ती का करावी हा सर्वात पहिला मुद्दा आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. एकतर मराठी भाषेकडे आता दुर्लक्ष होत चालले आहे.

राज्यातील सर्व बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी सक्तीची करावी यावरून गेल्या अनेक वर्षांपासून वादंग सुरू आहे. मात्र, महाविकास आघाडी सरकारचे या मागणीसाठी पुन्हा एकदा प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यामुळे मराठी सक्तीची गरज काय, हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

सध्या सगळीकडेच इंग्रजी माध्यम आणि इंग्रजी भाषेचा बोलबाला आहे.

महाराष्ट्राची ही भाषा असूनही महाराष्ट्रीयन अथवा मराठी भाषिकही आता याचा वापर जास्त करत नाहीत

त्याचप्रमाणे जागतिक स्पर्धेमध्ये आपल्या पाल्याने टिकावे यासाठी इंग्रजीकडे कल वाढतच चालला आहे. म्हणूनच आता मराठीचा समावेश व्हावा आणि मराठी भाषा किमान महाराष्ट्रात तरी व्यवस्थित बोलली जावी यासाठी तरी आता द्विभाषा सूत्र स्वीकारण्याची गरज आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी भाषिकांनी आपल्या मुलांना मराठी भाषेचा अभिमान असल्याचे स्वतः सांगितले तरच मुलांच्या मनावरही त्याचा परिणाम

नक्कीच होईल. मराठी ही भाषा केवळ सक्तीने शिकून चालणार नाही तर त्यातील गोडवा आणि त्यातील मजा ही आपल्या मुलांना आपणच शिकवायला हवी हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. मराठीची सक्ती करण्यात यावी की नाही यावर अनेक वाद आहेत. पण, सक्ती केल्यानंतर त्या भाषेचा गोडवा मुलांच्या मनात निर्माण करण्याचं काम शिक्षक आणि पालक या दोघांचेही असायला हवेत. केवळ भाषा आहे आणि सक्ती केली आहे म्हणून ती शिकण्यात काहीच अर्थ नाही. पण, मराठी ही आपली मायबोली, आपली मातृभाषा आहे हे लक्षात घेणे जास्त महत्त्वाचे आहे. इतर राज्यांप्रमाणे आपल्या भाषेची सक्ती करणे हे योग्य आहे. पण, त्याचा दुसऱ्या बाजूनेही तितकाच विचार व्हायला हवा. सक्तीपेक्षाही त्याचा गोडवा निर्माण कसा करता येईल.

- अश्विनी श्रीरंग गोरे

- बी. एड.  व्दितीय वर्ष

- रो. नं. 11119



# प्रवासवर्णन



शैक्षणिक सहलीसाठी आम्ही सगळे दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर येथे जमलो होतो. प्रवासासाठी ट्रॅव्हलरची स्वतंत्र सोय कॉलेजने केली होती. सहलीला जाण्यासाठी आम्ही सगळे खूपच उत्सुक होतो.

दिनांक 9 जानेवारी 2020 रोजी सुमारे रात्री 8.30 – 9.00 वाजता आम्ही निघालो. पंढरपूर- मोहोळ या मार्गाव्दारे सकाळी 10 जानेवारी 2020 रोजी सुमारे 06.30-7.00 सकाळी पोहोचलो. महाड येथे पोहोचलो. सर्व सोयी- सुविधेसाठी हॉटेल साईतेज या हॉटेलची निवड केली होती. चार जणांमध्ये एक रूम अशी व्यवस्था केली होती. हॉटेल खूप स्वच्छ, सुंदर व सुविधायुक्त होते. त्यानंतर सगळेजण फ्रेश होऊन नाष्टा व चहा घेतला. आणि पुढचा प्रवास चालू झाला.

पहिला आम्ही महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे पाहिलो. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक 20 मार्च 1927 रोजी केलेल्या पाण्याच्या सत्याग्रहामुळे जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे हे तळे. या तळयाची लांबी 100 * रूंदी 100 मीटर असून सदरचे तळे 5.5 मीटर खोल आहे व त्याचे अंदाजे क्षेत्रफळ 2.5 एकर आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या असंख्य अनुयायांसोबत या तळयातील पाणी प्राशन करून हा पाणवटा सर्वांसाठी खुला करून दिला. या सत्याग्रहामुळे सामाजिक समतेचे रणसिंग फुंकले गेले. अशाप्रकारे हा सर्व इतिहास तेथील गाईडने आम्हाला सांगितले.

आज सद्यस्थितीत चवदार तळयाच्या चारही बाजूने सुशोभित कठडे बांधलेली आहेत. चवदार तळयाच्या  पश्चिमेकडील भिंती पासून सुमारे 100 फुटावर पाण्यामध्ये चौथरा बांधला असून या चौथऱ्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा साडे दहा फुट उंचीचा पुर्णाकृती ब्रॉझचा पुतळा उभारण्यात आला असून त्या ठिकाणी  जाण्यासाठी पुल बांधण्यात आला आहे. तसेच येथे एक बहुद्देशीय सभागृह आहे. या सभागृहाचा उपयोग विविध सभा, कार्यक्रमसाठी करण्यात येतो. या सभागृहाच्या तळमजल्यावर वाचनालयांची ही सोय आहे.

चवदारतळे पाहून झाल्यानंतर आम्ही रायगडसाठी निघालो. सुमारे सकाळी 11.00-11.30 ला आम्ही रायगड किल्ल्याजवळ म्हणजेच पायथ्याशी पोहोचलो. पायथ्याशी येताना खूप भिती वाटत होती, कारण रस्ता छोटा आणि बाजूलाच घाट समोरून दुसरी गाडी आली की आणखी भीती वाटायची. जेवण वर गडावर जाऊनच करावयाचे होते, त्यामुळे आम्ही जेवणाचे सर्व साहित्य घेऊन गड चढायला सुरूवात केलो. काही जण रोपवेने गडावर गेले पण गड चढताना जे दृश्य दिसतंना त्याची मजाही वेगळीच असते त्यामुळेआम्ही चालत जाण्याचा निर्णय घेतला.

रायगड हा निसर्गरम्य असा कोकण प्रदेशात आहे. गड चढताना आजूबाजूच्या प्रदेशातील भारावून टाकणारी निसर्गरम्य दिसतात. जेव्हा ढग भव्य सहयाद्रींना टेकतात ते दृश्य तर डोळयात मावेनासे होते. किल्ल्यावर जाण्यासाठी सुमारे 1500 पायऱ्या आहेत. गड चढायला अंदाजे 2.00 – 2.30 तास लागतात. गडावर थोडया-थोडया अंतरावर पाणी बॉटल व खाऊचे दुकाने आहेत. गड चढताना खूपच तहान लागते त्यामुळे थोडी विश्रांती घेत घेत गड चढावे लागते.

गडावर ऐतिहासिकदृष्टया महत्वाची अशी ठिकणं म्हणजे राजदरबार, राजदरबाराचे प्रवेशव्दार, शिवाजी महाराजांची समाधी, जगदीश्वराचे मंदीर, बाजारपेठ, टकमक टोक इ. हे सर्व दृश्य पाहून इतिहासात फारशी रूची नसणाऱ्या व्यक्तीलादेखील शहारा येईल. हे सर्व ठिकाण पाहायला 2-3 तास अंदाजे आम्हाला लागले. किल्ल्यावरील आणखी एक आकर्षक गोष्ट म्हणजे टकमक टोक.

टकमक टोकावर येऊन उभा राहिल्यानंतर येथे वाहणाऱ्या चाप्यासोबत मनावरचे ताण दूर होऊन मनाला शांतता लाभते. येथील प्रत्येक ठिकाणाची आम्ही खूप फोटो काढली.

सर्व ठिकाण पाहून झाल्यानंतर आम्ही सर्वजण मिळून एका ठिकाणी बसून जेवण केलो. सर्वांनी आणलेले पदार्थ सर्वांना वाटून खाल्ले. सर्वांना आपण आणलेले पदार्थ देण्यात काही वेगळाच आनंद असतो. जेवण झाल्यानंतर आम्ही गड उतरण्यास सुरूवात केली. गड उतरताना सुर्य उतरूण पश्चिम दिशेला क्षितिजा जवळ आला होतो. सूर्यास्ताचा हा सुंदर दृश्य मी कधीच दिसणार नाही.

गड उतरून परत आम्ही हॉटेलला आलो. गड चढताना जेवढा वेळ लागला तेवढा उतरताना लागला नाही पण खूप पाय दुखत होते. आम्ही पहिलेले दृश्य ते अनुभवाच्यासमोर हे दुखणे काहीच नव्हते. फ्रेश होऊन आम्ही आमच्या रूममध्येच थोडे फार जेवण केलो आणि झोपलो कारण परत सकाळी लवकर उठायचे होते.

दिनांक 11 जानेवारी 2020 रोजी आम्ही सकाळी 5.00 ला उठलो. सगळयांच आवरून झाल्यानंतर नाष्टा केला आणि चहा घेतला. त्यानंतर आम्ही मुरूड-जंजिरा किल्ला बघण्यासाठी निघालो. साधारणत: सकाळी 8.00-8.30 ला आम्ही निघालो. आणि सकाळी 8.00-8.30 ला आम्ही निघालो. आणि सकाळी 11.00-11.30 ला तिथे पोहोचलो. उतरल्यानंतर दृष्टीस पडला तो सुंदर समुद्र किनारा. समुद्र किनारा हा स्वच्छ ठेवला होता. पिकण्यासाठी मासे, शहाळ असे अनेक पदार्थ, वस्तूचे दुकान होते. आम्ही तेथील शहाळाचा आस्वाद घेतला.

जंजिरा किल्ला हा समुद्राच्या मधोमध असल्यामुळे इथून पुढचा प्रवास होडीने करावे लागते. साधारण 10-15 मिनिटे लागतात. किल्ल्यावर जाण्यासाठी कमीत कमी 20 प्रवासी जमल्यावर होडी सोडण्यात येते. होडीचा जो व्यक्ती असतो. तोच किल्ल्याची माहिती सांगतो आणि परत आणून सोडतो.

किल्ल्याच्या चोहोबाजूनी पाणी असल्यामुळे त्याचा दरवाजा जवळ गेल्यानंतरच दिसतो. हा किल्ला राजपूरी गावाच्याअरबी समुद्रात एका बेटावर आहे. किल्ल्यावर 572 तोफा आहेत. या तोफांमध्ये विशेष मोठी आणि लांब

पल्ल्याची कलाल बांगडी तोफ होती. हा किल्ला कोणीच जिंकू शकला नाही. त्यामुळे याला अजिंक्य  असेही म्हटले जाते. हा किल्ला सिद्दीने बांधला आहे.

किल्ल्याला 19 बुलंद बुरूज आहेत. मध्यभागी भव्य वाडा, पाण्याचे दोन मोठे तलाव तेही गोडया पाण्याचे तलाव असे प्रमुख ठिकाणे किल्ल्यावरील आहेत. असा हा जंजिरा किल्ला आणि त्याचा  इतिहास अतिशय रोचक आहे. किल्ल्यावर उभार राहून नजर  फिरवली कि सगळीकडे पाणीच दिसतं आणि हा दृश्य खूप सुंदर दिसतो.

किल्ला पाहून परत यायला आम्हाला साधारण   दुपारी 03.30 -04.00 वाजले. तेथून आल्यानंतर सर्वांनी मिळून जेवण केलो. जेवण झाल्यानंतर तिथेच थोडी फार खरेदी केली आणि परत सोलापूरकडे येण्याचा प्रवास सुरू झाला. सकाळी 12 जानेवारी 2020 रोजी सुमारे 6.30- 7.00 ला आम्ही सोलापूरला पोहोचलो.

या सहलीतून खूप सुंदर अनुभव, दृश्य जे की कधीही न विसरणारे  असे आम्हाला मिळाले. रायगडवरचे दृश्य तर अजून ही डोळे मिटले की दिसते. असा हा सुंदर प्रवास  मी कधीही विसरणार नाही.

- देवकते  रोहिणी
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. - 20203



# घरोघरी गाडगेबाबा- प्रा. रा. तु. भगत पुस्तक परीक्षण




- पुस्तक नाव - मी निवडलेल्या पुस्तकांचे नाव आहे ' घरोघरी गाडगेबाबा ' लेखक प्राचार्य रा. तु. भगत असे आहे. आणि या पुस्तकावर संत गाडगेबाबाचे छायाचित्र आहे. पुस्तकाचे मागेदेखील गाडगेबाबांचे फोटो लहान आहे. आणि त्याखाली एका परिच्छेदात लिखाण करण्यात आले आहे.
- पुस्तक निवडीचे कारण - सदर पुस्तक मी का निवडले यांचे कारण देखील मला दयायला आवडेल. ज्यांनी संपूर्ण आयुष्याचं त्याग करून जनकल्याणासाठी व समाजासाठी आपले संपूर्ण जीवन फुलांसारखे वाहून दिले. हातात गाडगं घेवून स्वच्छ व सुंदर परिसर बनविण्यासाठी ज्यांनी किर्तन हे प्रभावी माध्यम वापरून 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ' असे म्हणत समाजाचे सेवेकरी झाले.

  भूकेलेल्यांना – अन्न<br>
  तहानलेल्यांना- पाणी<br>
  उघडया- नागडयांना- वस्त्र<br>
  बेघरांना- आसरा

बेकारांना – रोजगार

गरीब मुलांमुलींना- शिक्षण

म्हणून समाजासाठी कार्य केले. त्यामुळे त्यांची ओळख मी पुस्तक वाचून सादर करण्यासाठी केलेले आहे.

- पुस्तकांचे वाचन – मी साधारणपणे हे पुस्तक दोन दिवस वाचले. कमीत-कमी 5 तासांत या पुस्तकांचे वाचन मी केले. वाचन करताना असे अनुभव आले. प्रत्येक वाक्यांत जीवंत गाडगेबाबाचं कार्य डोळयासमोर येत होता.
- पुस्तकातील प्रमुख मुद्दे व उपमुद्दे लेखन- या पुस्तकापुढील मुद्दे आहेत. संस्कार, लग्न, पहाट, कलाटणी, भ्रमंती, आत्मपरीक्षण, पांडुरंग, उपाय, लोकसेवा, कीर्तन,नि:स्पृश्यता, चंदन, फकीर, अभिषेक, देवपूजा, स्वच्छता, शिवाशीव, सत्यानाश, लग्नसोहळज्ञ, स्थितप्रज्ञ, संत सहवास, समता, महापूजा, घास, व्यासपीठ, आशीर्वाद दीपस्तंभ, लोकसंत, भूतदया, सत्यनारायण, देवतूल्य, विदया, दया कर्मयोगी, बळीप्रथा, अंधश्रध्दा, स्वयंवर, सदावर्त, पुरूषोत्तम, पर्वणी, कसोटी, नवस, माऊली, कमलपत्र, सुखसंवाद, कीर्ति, व्यसन, परोपकार माणूस, परमार्थ, प्रपंच, नवरा, भजन, संत, विद्यापीठ, फूलवात निर्मोही, भूजंग, सप्ताह, भाग्य, आनंदयात्री, इच्छा, पसायदान इ. आहेत.
- पुस्तकांच्या शैलीविषयीलेखन विचार- पुस्तकांतील वाक्य शब्द सर्वसामान्य विद्यार्थी वाचल्यानंतर समजेल अशी लेखनशैली आहे. त्यातील वाक्य अर्थपूर्ण बोध देणारी आहेत व प्रत्येक वाक्यातून जीवंतपणा आहे. एकूणंच गाडगेबाबांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेले कामाचे पूर्णपणे चित्र या छोटया अशा पुस्तकातूंन मांडण्यात आला आहे.
- पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना- संत गाडगेबाबा एक निरक्षर मनुष्य एकटया माणसाचे सैन्य या धरतीच्या लेकरावर प्रेमाचे पांघरूण घालणारे महामानव. असा उल्लेख प्रस्तुत पुस्तकातून करण्यात आला आहे.
- पुस्तकाची ओळख बाहय घटक-

1. लेखक परिचय – या पुस्तकाचे लेखक प्राचार्य रा. तु. भगत आहेत. या पुस्तकाचे लेखन 1 जानेवारी 2000 मध्ये करण्यात आले आहे.
2. पुस्तकाचा आकार- पुस्तकाचा आकार मध्यम आहे. व हातळण्यायोग्य आहे.
3. पुस्तकाचा कागद- सदर पुस्तकांतील पेजेसचे कागद चांगल्या प्रतीचे आहेत.
4. पुस्तक मुखपृष्ठ व मलपृष्ठ- पुस्तकाच्या मुखपृष्ठावर शीर्षक व पुस्तकाचे नाव आहे. तर मलपृष्ठावर संत गाडगेबाबांची हिती देण्यात आली आहे.
5. बांधणी- सदर पुस्तकाची बांधणी छान आहे. या पुस्तकातून एकूण 50 पान आहेत.
6. किंमत- सदर पुस्तकाची किंमत फक्त 65 रू आहे.
7. छपाई – या पुस्तकांचे प्रकाशक सिध्दराज प्रकाशन, 934, स्वागत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नागराज मंदीरासमोर, कात्रज येथे आहे.

- पुस्तकाची प्रस्तावना - सदर पुस्तकात संत गाडगेबाबाच्या संपूर्ण कारकिर्दीत केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. संत गाडगेबाबा एक निरक्षर मनुष्य एकटया माणसाचे सैन्य या धरतीच्या लेकरावर प्रेमाचे पांघरूण घालणारे महामानव . तळगाळात जगणाऱ्या माणसांच्या मनात जगण्यांची नवी उर्मी निर्माण करणारे बाबा कीर्तनातून अमृत विचारांची बरसात करत होते.

  महाराष्ट्राच्या संत परंपरेतील गाडगेबाबा हे एकच असे संत असे आहेत की, ज्यांची विविध छायाचित्रे आज उपलब्ध आहेत. त्यामधील दुर्मिळ बत्तीस छायाचित्रांचा या चरित्रमय पुस्तकात समावेश केला आहे.

- अंतर्गत घटक –

1. प्रकरण रचना – सदर पुस्तक वाचताना मला अतिशय आनंद झाला आहे. या पुस्तकात एकूण 65 प्रकरण आहेत. त्यातील प्रत्येक प्रकरण वाचण्यायोग्य सुस्पष्ट, सुंदर लेखनशैली करण्यात आले आहे.

अशाप्रकारे यात या सर्व मुद्दयांचा व प्रकरणाचा विचार केलेले आहे. जरी या पुस्तकाची किंमत कमी असली तरी या पुस्तकात प्रचंड असा ज्ञानाचा साठा व स्त्रोत आहे. हे मला या ठिकाणी सांगण महत्तवाचं वाटतो. अशाप्रकारे या पुस्तकातील प्रकरणाची रचना योग्य व उत्तमप्रकारे करण्यात आले आहे.

2. पात्रे परिचय – या पुस्तकात प्रामुख्याने कोणतेही पात्र नाहीत, तर या पुस्तकात संपूर्णपणे गाडगे महाराजांच्या जीवनपटलावर आधारीत हे पुस्तक आहे. या संत नामदेव, संत रामदास, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर इ. च्या ओवी या पुस्तकात आहेत हे आपणास सांगता येईल.
3. पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना- गाडगे महाराज हे एक निरक्षर मनुष्य. या निरक्षर मनुष्यांनी स्वत:चा विचार न करता समाजाचा विचार करून आपलं घरदार सोडले व मुलाबाळांना समाजाला सोडून देवासाठी एक स्वच्छतेचे संदेश देण्यासाठी घराबाहेर पडलेल्या या महाराजांचा उल्लेख वेगवेगळया प्रसंगातून या पुस्तकात करण्यात आला आहे.
4. पुस्तकाची शैली – प्रस्तुत पुस्तकातील लेखनशैली व पुस्तकांची बांधणी, पुस्तकांचे किंमत एकूणचं या पुस्तकाला साजेसे आहे. या पुस्तकांची किंमत कमी असल्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना घेण्यासारखे व परवडणाऱ्यासारखे आहे.
5. लेखन करण्यामागे लेखकाचा उद्देश – देशात अनेक समाजसुधारक होवून गेले त्यापैकी साधी राहणीमान व उच्च विचारसरणीचे एक समाजसुधारक होवून गेले. त्याचं नाव आहे. संत गाडगे महाराज ज्यांच्या कार्याचा उल्लेख करावा तितका कमीचं आहे.
6. पुस्तकातील चित्रे, फोटो, आकृत्या व चिन्हे - या पुस्तकात गाडगेमहाराजांच्या जीवनपटलावर आधारित अनेक छायाचित्रे शेवटच्या पेजवर 6 ते 7 पेजवर दाखवण्यात आले आहे. त्याप्रत्येक फोटोच्या शेजारी त्या फोटोच्या त्या फोटोचे पुरावे दर्शविण्यात आले आहे. उदा- इ.स. नासहीत उल्लेख करण्यात आले आहे. या पुस्तकांत आकृत्या

काढलेले नाहीत, योग्य  त्या ठिकाणी योग्य शब्द व चिन्हांचा वापर करण्यात आला आहे.

7. पुस्तकातील  महत्त्वाची अवतरणे -  या पुस्तकात मला भावलेले अनेक वाक्य आहेत त्यात स्वच्छतेचे संदेश मला आवडले. त्यानंतर मनुष्याचा कर्जावरदेखील त्यांनी  भाष्य केले आहेत.  गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ।

8.  पुस्तकाचा उद्देश सफल झाला का – माझ्या वाचनात अनेक असे या पुस्तकातील  भावनिक झालेले वाक्य आहेत. या पुस्तकांचा एकूणचं उद्देश सफल झाला आहे, असे मला वाटते. एकदा अवश्य पुस्तक सर्वांनी वाचावे असे मला वाटते.

9. पुस्तकातून दिलेला संदेश -  या पुस्तकातून लेखकांनी गाडगे महाराजांच्या जीवनाच्याप्रसंगी घडलेल्या घटनांचे वर्णन करून खूपचं मोलाचे संदेश  दिले आहे. या पुस्तकातून संदेश असा मिळतो की, गोरगरिबांना मदत करा, बेकराना- रोजगार द्या.,  बेघरांना आसा द्या, गरीब मुला-मुलींना शिक्षण द्या, अंध-पंगू रोग्यांना औषध द्या.

10. पुस्तकाविषयी तुमचे निष्कर्ष – या पुस्तकाविषयी  माझे निष्कर्ष असे आहेत की, सर्वांना आपण समानतेने वागवले पाहिजेत, प्रत्येकांना मदतीची गरज असते. जीवनात जास्त काही कमावलो नाही तरी चालेलं परंतू आयुष्यात माणसे कमवायला पाहिजे यातून बोध होतो. माणसाच्या मनातली जी विचारसरणी आहे, ती कुठे तरी बदलायला पाहिजे. सकरात्मक दृष्टीकोनातून विचार करायला पाहिजे हे या पुस्तकातून सांगण्यात आले आहे.

11. पुस्तकाविषयी शिफारशी -  या पुस्तकातून  या शिफारशी सांगण्यात येते की, यामध्ये एकमेकांविषयी असलेली आपुलकीची भावना स्पष्ट होते. गाडगे महाराजांनी  प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वत:ला समाजाशी कसे समायोजन केले. या पुस्तकातून समजतो. या पुस्तकात तसे पाहिल्यास अनेक संदेश या वेगवेगळया पाठातून देण्यात आले आहे.

12. पुस्तक परिक्षण सादरीकरण – सदर पुस्तक सादरीकरण कोव्हीड - 19 च्या प्रादुर्भावामुळे मी ऑनलाईन पध्दतीने सादरीकरण करणार आहे. सादरीकरण करत असताना मी पी.पी.टी. चा वापर करणार आहे.

- स्वमत - सदर प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी मला डॉ. व्ही. बी.किडगांवकर सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे, त्यांचे ही मी खूप खूप ऋणी आहे.



- चौलगी रूपाली
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं. -11112

# आयुष्याचे धडे गिरवताना – लीना सोहोनी




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत असलेल्या बी. एड. भाग-2 सत्र 4 मध्ये असलेल्या अभ्यासक्रमात EPC या विषयांतर्गत असलेल्या प्रात्यक्षिकांमध्ये 'Book review and presentation after reading a book' पुस्तकाचे चिकित्सक परीक्षण करून त्याचे सादरीकरण करणे हे एक प्रात्यक्षिक होते.

या प्रात्यक्षिकामध्ये आम्ही वाचलेल्या एका पुस्तकाचे चिकित्सक परीक्षण करून त्याचे सादरीकरण करायचे होते. या प्रात्यक्षिकासाठी मी सुधा मूर्ती यांचे आयुष्याचे धडे गिरवताना हे पुस्तक निवडले.

- उद्दिष्टये –
  1. विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण कसे करावे हे समजण्यासाठी
  2. विद्यार्थ्यांना पुस्तकाचे चिकित्सक आकलन होण्यासाठी
  3. एखादया पुस्तकातून फक्त मनोरंजनच नाही तर त्यातून ज्ञान, संदेश, माणुसकीची मूल्येही घ्यावी हे सांगण्यासाठी.
  4. एखादया पुस्तकाचा थोडक्यात परिचय करून देता येण्यासाठी.

5. एखादे पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुस्तक परीक्षण आवश्यक आहे.

1. पुस्तकाची निवड - या प्रात्यक्षिकांसाठी मी सुधा मूर्ती यांचे आयुष्याचे धडे गिरवताना हे पुस्तक निवडले खरंतरं हे पुस्तक सुधा मूर्ती यांच्या

The Day I stopped Drinking Milk- Life stories From here and there. या पुस्तकाचा लीना सोहोनी यांनी केलेला अनुवाद आहे. मूळात मला चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णन अशी पुस्तके वाचायला आवडतात आणि या पुस्तकात तर सुधा मूर्ती यांच्या आयुष्याच्या प्रवासात त्यांना भेटलेल्या वेगवेगळया माणसांच्या तसेच त्यांना आलेल्या अनुभवांबद्दल त्यांनी लिहिलेले आहे.

2.पुस्तकाचे वाचन – या पुस्तकाचे वाचन मी एकदाच केलेले आहे. या पुस्तकामध्ये वेगवेगळया अशा 23 कथा आहेत, यातील प्रत्येक कथेत एक वेगळा अनुभव, एक वेगळी कथा आहे. काही त्यांनी अनुभवलेल्या तर काही त्यांनी ऐकलेल्या कथा सांगितलेल्या आहेत.

3.पुस्तकातील प्रमुख मुद्दे व उपमुद्दे लेखन - या पुस्तकातील मुद्दे किंवा उपमुद्दे हे इतक्या स्पष्टरीतीने मांडलेले आहेत की, ते वाचताना मनात कोणतीही शंका येत नाही. वाचलेल्या घटकाचे लगेच आकलन होते.
4.पुस्तकाच्या शैलीविषयी लेखन विचार – सुधा मूर्तीच्या जीवनात त्यांना आलेले अनुभव, भेटलेली माणसे, प्रसंग, घटना हे सर्व साध्या शब्दांमध्ये, भावनांच्या शब्दामध्ये मांडण्याची शैली या पुस्तकामध्ये दिसते.
5.पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना - हे पुस्तक एक कथासंग्रह असून या पुस्तकात सुधा मूर्तींनी आपल्या जीवनात आलेल्या माणसांमुळे मिळालेले अनुभव, घडलेल्या घटना, प्रसंग तसेच आपण ऐकलेल्या काही कथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पुस्तकाचे परीक्षण –

अ. पुस्तकाची ओळख बाहय घटक –

1.लेखक परिचय - सुधा मूर्ती यांचा जन्म 19 ऑगस्ट 1950 रोजी झाला. त्या एक अभियांत्रिकी शिक्षक, कन्नड, मराठी, इंग्रजी लेखक तसेच सामाजिक कार्यकर्त्या आहेत.
2.पुस्तकाचा आकार - पुस्तकाचा आकार हा एवढा आहे. आणि पुस्तकाची जाडीही जास्त नाही. या पुस्तकाचा आकार मध्यम स्वरूपाचा आहे.
3.पुस्तकाचा परिचय- हे पुस्तक सुधा मूर्ती लिखित असून त्यात त्यांच्या आयुष्यात त्यांना भेटलेल्या व्यक्तीविषयी, घडलेल्या घटना, प्रसंगांविषयी सांगितलेले आहे.
4.पुस्तकाचा कागद - या पुस्तकासाठी वापरलेला कागद हा उत्तम दर्जाचा आहे. पांढरा शुभ्र आहे. तसेच फारसा चिवट नाही सातत्याने हाताळल्यास तो फाडू शकतो.
5.पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ – या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सुधा मूर्ती यांचे चित्र आहे. तर या पुस्तकाच्या मलपृष्ठावर या पुस्तकाविषयीची थोडी माहिती दिलेली आहे व सुधा मूर्तींच्या अन्य तीन पुस्तकांची छायाचित्रे दिलेली आहेत.
6.बांधणी – या पुस्तकाची बांधणी चिकट पध्दतीची असून दस्त स्वरूपात चिटकवून तयार केलेले आहे. पुस्तकाची बांधणी पक्की आहे.
7.किंमत – या पुस्तकाची किंमत 126 रूपये आहे.
8.छपाई - या पुस्तकाची छपाई मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे यांनी केलेली आहे. या पुस्तकाची छपाई योग्य आहे. शीर्षक व आशय योग्य आकारात छापलेले आहेत. मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांची छपाई पण छान आहे. पुस्तक मुद्रण करणाऱ्याचे नाव सुध्दा दिलेले आहे.
9.पुस्तकाची प्रस्तावना - या पुस्तकाची प्रस्तावना लीना सोहोनी यांनी लिहिलेली आहे. यामध्ये त्यांनी या पुस्तकामध्ये असलेल्या कथांबद्दल व लेखिकेबद्दल सांगितलेले आहे.

## ब. अंतर्गत घटक

1. प्रकरण रचना - हे पुस्तक एक कथासंग्रह आहे. यात प्रकरण नाहीत, परंतु वेगवेगळया कथा आहेत, अशा एकूण 23 कथा या पुस्तकात आहेत.
2. पात्रे परिचय – या पुस्तकातील मुख्य पात्र म्हणजे सुधा मूर्ती या स्वत: आहेत. बाकीची अशी इथे अनेक पात्रे या पुस्तकात दिलेली सांगितलेली आहेत.

3. पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना - या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना म्हणजे सुधा मूर्तींना भेटलेल्या माणसांच्या व्यक्तिरेखा या पुस्तकांत मांडलेल्या आहेत. मूल्यांवर असलेली श्रध्दा तसेच माणुसकीही मूल्ये या व्यक्तिचित्रात्मक कथांच्या केंद्रस्थानी आहेत.

4. पुस्तकाची शैली- सुधा मूर्तींच्या जीवनामध्ये आलेल्या माणसांच्याकडून त्यांना मिळालेले अनुभव मांडण्याचा त्यांचा या पुस्तकाच्या माध्यमातून प्रयत्न दिसतो. त्यासाठी त्यांनी या पुस्तकात अनुभवशैलीचा वापर केलेला आहे.

5. लेखन करण्यामागचा लेखकाचा उद्देश – या पुस्तकाचा मुख्य उद्देश आपले अनुभव सगळयांना सांगणे हा असू शकतो. या पुस्तकातून जग कसं असतं, जगात असलेली लोकं वेळेनुसार कशी बदलतात? हा लेखिकेचा हे पुस्तक लिहिण्यामागील उद्देश आहे, असे मला वाटते.

6. पुस्तकातील चित्रे, फोटो, आकृत्या व चिन्हे - या पुस्तकामध्ये कोणतीही चित्रे, फोटोज, आकृत्या व चिन्हे नाहीत.

7. पुस्तकातील महत्त्वाची अवतरणे – या पुस्तकात अनेक अशी अवतरणे आहेत, जे थोडया शब्दात खूप काही सांगतात त्यातील दोन अवतरणे आहेत.

8. पुस्तकाचा उद्देश सफल झाला का ?- हो झाला मला माणसं जाणून घ्यायला आवडतं एखादी व्यक्ती माझ्या आयुष्यात आल्यानंतर ती कशी आहे, तिची स्वभाववैशिष्टये जाणून घेण्यात मला रस असतो.

9. पुस्तकातून दिलेला संदेश - या पुस्तकातून आपले अनुभव जरी लेखिकेने सांगितले असले तरी हे पुस्तक आपणास खूप काही सांगून/ शिकवून जातं. प्रत्येक माणसं/व्यक्ती ही वेगळी असतात, मनात कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न बाळगता आयुष्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा स्वीकार करावा. तिला होईल तेवढी मदत करावी आणि तीही कोणत्याही प्रकारच्या परतफेडीची अपेक्षा न करता.

10. पुस्तकाविषयी तुमचे निष्कर्ष - हे पुस्तक जरील लेखिकेने आपले अनुभव सांगण्यासाठी किंवा घटना, प्रसंग सांगण्यासाठी लिहिले असले तरी पुस्तक वाचल्यानंतर प्रत्येकाच्या मनात काही तरी विचार येतातचं. तसेच माझ्या मनातही आले. मला माहिती नाही ते कितपत योग्य आहेत, परंतु प्रत्येकाची विचार करण्याची पध्दती वेगळी असते. बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असतो.

11. पुस्तकाविषयी शिफारसी - या पुस्तकामध्ये जसे सुधा मूर्तीनी आपल्या अनुभवशैलीच्या माध्यमातून आपले लेखन सादर केले आहे. तसेच त्यांच्या इतर

पुस्तकांतूनही केले आहे. त्यासाठी त्याची परीघ, डॉलर बहू, महाश्वेता, तीन हजार टाके, वाइज अॅन्ड अदरवाइज, स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं. पितृऋण ही पुस्तके वाचून त्यांच्या या लेखनशैलीचा आस्वाद घेऊ शकता.

12. पुस्तक परीक्षण सादरीकरण – या पुस्तक परीक्षणाचे सादरीकरण मी पी. पी. टी. च्या साहाय्याने ऑनलाईन पध्दतीने करणार आहे.

अशाप्रकारे या प्रात्यक्षिकासाठी जे मार्गदर्शन हवे होते, त्यामध्ये पुस्तक परीक्षण कसे करावे, काय करावे या गोष्टी अतिशय सुंदर रीतीने डॉ. व्ही. बी. किडगांवकर सरांनी समजावून दिले. त्यासाठी सरांचे विशेष आभार.

- भद्रशेट्टी प्रज्ञा
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं. -11117



# राजर्षी शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण



हिंदू समाजरचनेत व्यावसायिक वर्ग आणि जाती यांच्या दोन विभागात विभागणी झाली आहे. त्या म्हणजे आर्य आणि अनार्य. आर्य म्हणजे ज्यांना शास्त्रात वेद पठणाचा अधिकार आहे ज्यांचे धार्मिक संस्कार व धार्मिक विधी वेदोक्त मंत्राने पार पाडले जातात आणि धार्मिक विधी व संस्कार करण्याचा अधिकार आहे म्हणजे आर्य.

आर्यांमध्ये पुन्हा तीन वर्ग होतात ते प्रतिष्ठेच्या क्रमाने ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ग वेदोक्त कर्मासाठी पात्र आहेत असे अनादीकालापासून समजले जाते. शुद्र वर्णीयांना वेद पठणाचा अथवा वेदोक्त मंत्रांनी संस्कार करण्याचे अधिकार नाहीत. म्हणजेच ते अनार्थ अथवा आर्येतर आहेत. शाहू महाराजाबाबतचे वेदोक्त प्रकरण काय हे समजून घेण्यासाठी आपल्याला त्याआधी घडलेल्या वेदोक्त प्रकरणाची माहिती घ्यावी लागते.

महाराष्ट्रातील पहिले वेदोक्त हे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकांच्या वेळेला घडले होते. त्यावेळी विश्वेश्वर भट्ट ऊर्फ गागाभट्ट या काशीच्या धर्मशास्त्रज्ञ महाराष्ट्रीय पंडीताने शिवाजी महाराज व त्यांचे भोसले कुळ हे राजस्थानातील सिसोविया या क्षत्रिय घराण्याचे आहे असे सांगत त्यांना वेदोक्त मंत्र आणि राज्याभिषेक संस्कार केला.

त्यानंतर महाराष्ट्रात पुन्हा वेदोक्त प्रकरणाचा वाद एकोणिसाव्या शतकात साताराच्या गादीचे प्रतापसिंह त्यांच्याबाबतीत घडला. त्यानंतर बडोदयाचे सयाजीराव महाराज व त्यानंतर शाहू महाराजांचे प्रकरण होय. शाहू महाराजांनी

1905 मध्ये आपल्या घराण्यातील  धार्मिक विधी वेदोक्त प्रकारे व्हावे असे आज्ञापत्र काढले. तसेच संकेश्वर करवीर मठाच्या शंकराचार्य करून त्याबाबतीतले आज्ञापत्र ही मिळवले मात्र या  प्रकरणाच्या  निमित्ताने करवीर व संकेश्वर पिठाच्या दोन परस्पर विरोधी शिष्य परंपरा  निर्माण झाल्या. त्याध्ये  वाईचा शिष्य वृंद हा महाराजाच्या विरूध्द उभा होता, तर महाराजांच्या आश्रयाखाली असलेले शंकराचार्य हे महाराजांच्या मते सर्व माणसांना वेदपठण याचा अधिकार आहे, असे ते पुरस्कार करू लागले.

या सगळयामुळे शाहू महाराज यांची दृष्टी जन्मसिध्द जातीभेदाच्या पलीकडे पोहचली होती. महाराजांच्या मते सर्व माणसांना वेदपठण  याचा अधिकार आहे, असे ते समर्थन करू लागले.  वंशपरंपरागत जातीभेदावर आधारीत असलेली वर्णव्यवस्था मानवी हिताची नाही, जाती आधारीत वर्णव्यवस्था जरा रूप धारण करते त्यामुळे समाजाची  अवनती होत आहे या भूमिकेशी महाराज पोहचले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री  जोशी म्हणतात की, छत्रपती शाहू महाराजांच्या वेळी महाराष्ट्रातील ब्राम्हण शास्त्री- पंडीतांनी जो वेदोक्ताचा वाद माजवला तो खरोखरच अज्ञान मूलक होता शास्त्री पंडीतांचा कमलाकर भटाचा  शत्रू धर्मतत्व हा ग्रंथ आधार होता तर कमलाकर भटाचा पुतण्या गागाभट्ट यानेच महाराष्ट्रातील वेदोक्ताचा अधि कार मराठयांना आहे हे मान्य केले होते. हा नुकताचा घडलेला इतिहास शास्त्री पंडीतांनी लक्षात घेतला नाही. त्यांची दोन कारणे आहेत पहिले कारण म्हणजे महाराष्ट्रातील मराठयांचा वेदोक्त कर्माचा अधिकार मान्य केल्यास त्यांची आणि ब्राम्हणांची  प्रतिष्ठेची श्रेणी यामध्ये अंतर राहत नाही  प्रतिष्ठेचा ब्राम्हणी अहंकार हे याचे कारण आहे. दुसरे कारण म्हणजे परंपरागत रूढीला तत्व समजून चिकटून बसणे. या अंधश्रध्देपायी आपण प्राचीन भारतातील समाज संस्थेचे आधारभूत किवा मूलभूत तत्व नाकारतो हे त्यांच्या लक्षात  आले नाही.

आता वेदोक्त प्रकरण म्हणजे काय ते पाहू सन 1894 ते 1922 या 28 वर्षाच्या  कारकिर्दीत सन 1900 ते 1905 या पाच वर्षाच्या काळात हे वेदोक्त प्रकरण झाले. शाहू महाराजांचे  कुलपुरोहित श्री नारायणराव राजोपाध्ये व शाहू महाराज यांच्यात हे प्रकरण होते. राजकारणात केल्या जाणाऱ्या दैनंदिन व नैमित्तिक स्वरूपाच्या सर्व धार्मिक क्रिया पुराणोत्क विधीनुसार न करता त्या फक्त वैदिक विधीनुसारच करण्यात याव्यात, असा आदेश शाहू महाराजांनी काढला होता. त्या आदेशाला नारायणराव राजोपाध्ये यांना कुलपुरोहित या पदावरून

काढूल टाकले तसेच त्यांना  वतन म्हणून देण्यात आलेल्या सर्व जमिनी सरकार जमा करण्यात आल्या आणि संस्थानच्या सरदारांच्या यादीतून त्यांचे नाव कमी केले. शाहू महाराजाच्या शासकीय कृतीविरूध्द  नारायण  राजोपाध्ये यांनी लढा देण्याचे  ठरविले. तसे पाहायला गेले तर हा विषय  नारायण  राजोपाध्ये व शाहू महाराज यांच्यातील होता. पण करवीर संस्थानमधील ब्राम्हण व महाराष्ट्रातील ब्राम्हण  यांनी  नारायणराव राजू पाध्ये यांना सक्रिय पाठींबा  देण्यास सुरूवात केल्याने तसेच शाहू महाराजांच्या विरूध्द आघाडी उघडल्याने हा प्रश्न केवळ शाहू महाराज व नारायण राजू पाध्ये यांच्यात  न राहता तो सार्वजनिक झाला.  याप्रकरणी संस्थानातील शासकीय  कर्मचारी व अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक नेते, विव्दत्त वर्ग, वकील, प्राध्यापक, समस्त ब्राम्हण समाज, वर्तमान पत्राचे संपादक मान्यवर, कायदेपंडीत, प्रभावी साहित्यक हेसुध्दा नारायणराव राजोपाध्ये यांच्या बाजूने सामील झाले.

नारायण राजोपाध्ये यांनी ब्रिटीश सरकारकडे इनाम  जमिनी वैध ठरविण्याची मागणी केली. ब्रिटीश हस्तक्षेपाची मागणी केली, करवीर संस्थानच्या जाहीर चौकशीची मागणी केली. त्यामुळे हा वाद आणखीनच चिघळला. ब्रिटीश सरकारने मात्र यामध्ये नारायणराव राजोपाध्ये यांना कोणत्याही प्रकारचे अभय दिले नाही. त्यांच्या या तिन्ही मागण्या मान्य केल्या नाहीत.  हे प्रकरण सुरू असताना ब्राम्हणांनी वेदोक्ताची बाजू घेणारे  पुरोहित व सामान्य ब्राम्हण यांना धार्मिक स्वरूपाची  शिक्षा देण्यास सुरूवात केली.

श्री नारायण भट्ट सेवेकरी यांनी वेदोक्त विधीनुसार राजघराण्यातील  धार्मिक काम करण्यास प्रारंभ केल्याने त्यांना  ब्रह्मवृंदाने धर्मबहिष्कृत  केले. त्यांच्यासह इतर सामान्य ब्राम्हणांना जे शाहू महाराजांच्या बाजूने होते. पूजा अर्चा धार्मिक कामे यास प्रतिबंध केला. तसेच महालक्ष्मी मंदीरात पूजेलाही प्रतिबंध केला त्याचप्रमाणे विटाळ होऊ नये म्हणून सार्वजनिक नळावर पाणी भरण्यास प्रतिबंध  केला. अंत्यसंस्काराला सुध्दा  प्रतिबंध केला.

अजून कमाल तर पुढेच आहे ब्राम्हणांनी छत्रपती शाहू महाराज यांच्यासोबत प्रक्षोभक वर्णन केले.1902 सालच्या मे महिन्यात शाहू महाराज इंग्लंडला निघाले असता त्यांना आशीर्वाद देण्यास साफ नकार दिला तसेच शाहू महाराज परत आल्यावर त्यांना महालक्ष्मी मंदीरात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आला या अगोदर असा निर्णय कित्येक लोकांच्याबाबतीत घेण्यात आला नव्हता.

त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावरून शाहू महाराज सुखरूप परत आल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ ठिकाणी आयोजित करण्यात आलेला सत्कार समारंभाच्या वेळेला विघ्न आणण्याचे अशांतता निर्माण करण्याचे प्रयत्न केले तसेच शाहू महाराज यांच्या अंत्यसंस्कारावेळी अनेक हरकती घेण्यात आल्या. दैवी प्रकोपाची भीती घालवण्यात आली. राजघराण्यात भयनिर्मिती करण्याचे षडयंत्र रचण्यात आले. शाहू महाराजांच्या क्षत्रिय तत्वावर आक्षेप घेण्यात आले. इनाम जमिनी बळकवण्यास आरोपही करण्यात आला. तसेच बडोदयाचे राजे सयाजीराव गायकवाड याच्या सांगण्यावरून हा वेदोक्ताचा वाद सुरू केला असा आरोप केला. वर्तमानपत्रातून ही शाहू महाराजांच्या विरूध्द जहरी प्रचार सुरू केला गेला. त्यामध्ये मोदवृत्त (पुणे ) काळ गुराखी (पुणे ) जगध्दितेच्छ (पुणे ) प्रेक्षक ( सातारा ) सुबोधसिंधू बेळगाव समाचार (बेळगाव ) ब्रह्मोदय (कोल्हापूर ) धर्म (वाई ) अशा अनेक वर्तमानपत्रातून लेख लिहिले गेले. तसेच काही खास पुस्तके प्रकाशित करण्यात आली. त्यासोबत नारायण राजोपाध्ये यांना सक्रिय पाठींबा देण्यासाठी अनेक मार्ग अवलंबले गेले. पण शेवटी वेदोक्त प्रकरणात लॉर्ड कर्झन यांनी 1905 ला अंतिम निर्णय दिल्यानंतर धर्मपीठ व ब्राम्हण समाजातर्फे निर्णय घेण्यात आले. 10 जुलै 1905 ला करवीर धर्मपीठाच्या वेदोक्त प्रकरणी निर्णय झाला. त्यामध्ये करवीर पीठ असे म्हणते की, छत्रपती शाहू महाराज यांचे घराणे क्षत्रिय असून वेदोक्त कर्म करण्यास काही हरकत नाही.

तसेच शंकराचार्यांनी शाहू महाराज क्षत्रिय आहेत तसेच त्यांनी वेदोक्त विधीनुसार धार्मिक कामे करण्यास हरकत नाही, यावर कुणीही शक घेणे नाही अशाप्रकारची आज्ञा केली.

या सगळयामुळे शाहू महाराजांच्या विरूध्द जहरी टिका करत असणारे, रोशपण नाकारणारे, दिशाभूल करणारे, क्षत्रियत्व नाकारणारे सर्व ब्रम्हवृंद तोंडावर आपटले. यातूनच महाराजांनी बहुजनांच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्याचे दिसून येते.


- श्रध्दा खराडे
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20238




# स्त्रीत्व




काळोखी रात्र झालेली होती, तो दाट अंधार आणि त्या अंधारात आई आणि आज्जी गावाकडच्या अंगणात असलेल्या मोठया चिंचेच्या झाडाखाली बसून गप्पा मारत बसलेल्या होत्या. आज ती शहाणी झाली, मोठी झाली आता आपल्याला तिच्याकडे जास्तीत जास्त लक्ष दयावं लागणार. तिला आता असं इथे- तिथे बसू नाही दिलं पाहिजे. आपण जर जास्त मोकळीक दिली, तर उगीच भलतं- सलतं होऊन बसायचं मग लोक नावं ठेवतील.

आज्जी- मग आता तिला शाळेत जाऊ दयायचं की नाही नाही जाऊ दिलं तर चांगलंच नाही का? कोण लक्ष ठेवणार तिच्यावर आणि किती वेळ लक्ष ठेवायचं आता वय झालंय तिचं. आणि हे सगळं घराच्या एका कोपऱ्यात बसून ऐकत असलेली ती मुलगी.

मला काय झालंय , शहाणी झाली आहे म्हणजे काय? मग मी काय एवढे दिवस वेडी होती का ? शाळेत तर जात आहे ना मी सगळं तर समजतयं ना मला आत्तापर्यंत आई मला किती वेळा म्हणली आहे की, माझी मुलगी हुशार आहे, शहाणी आहे मग तेव्हा का काय म्हणली नाही ती. मग आता शाळेत जाऊ देणार नाही का ? असे विविध नाना प्रकारचे प्रश्न तिच्या मनात येतात. आणि उत्तर तर एकाही प्रश्नाचे नाही मग आता काय करायचं, कोणाला विचारायचं आईला विचारू का ? की आज्जीला विचारून बघू कोणाला विचारू का मित्र- मैत्रीणींना विचारू पण सांगू काय? मला काय झालयं, हे कसं सांगायचं, मला कोणता आजार तर नाही ना झाला. गेले 2-3 दिवस झाले मला असं होतयं एक

दिवस होऊन कमी झालं असतं तर मी आज्जी किंवा आईला सांगितलं नसतं. पण मग मी सांगितलं नसतं आणि मला कोणता तर आजार झाला असता तर पण मग आता काय ?

प्रश्न प्रश्न आणि प्रश्न. प्रश्नांचा नुसता गोंधळ उडून गेलेला. एकाही प्रश्नाचं उत्तर नव्हतं तिच्याकडे. असं वाटत होतं जणू काही हया प्रश्नाचे उत्तर नाही भेटलं तर कदाचित माझा श्वास थांबेल की काय एकीकडे हे प्रश्नाचं वादळ तिच्या मनात असताना दुसरीकडे हया प्रश्नांमधून एक गोष्ट राहून राहून मनात येत होती आणि मात्र सुरू झाला तो हट्ट ' मला शाळेत जायचं आहे. '

मग आता सुरू झाला त्यांचो विरोध आणि त्यातल्या त्यात ती पुण्यात राहत असल्यामुळे तिथेच शिकत होती आणि आज्जी मात्र गावाकडची आणि मग आज्जीचे ते विचार मग ती आईच ऐकत होती ना तिचं मात्र एकच यआता शाळेत जायचं नाही लग्न उरकून टाकायचं.

लग्न म्हणजे काय असतं हे त्यावेळी अजून माहित नव्हत पण तिचं एकच होतं की, हे लोक मला खेळू देणार नाहीत , शाळेला जाऊ देणार नाहीत आणि सर्वांत महत्त्वाचं मला माझ्या मनाप्रमाणे जगू देणार नाहीत. मग तिचं ते सुरू झालं रडणं, ओरडणं, आदळ- आपटणं, नुसता गोंधळ.

हे सगळं बघून त्यांचे नियम आणि अटी असे सुरू झाले. शाळेत लवकर जायचं नाही म्हणजे जसं की खेळ खेळण्यासाठी अगोदर शाळेत जात असतं, तसं आता जायचं नाही, शाळा सुटल्यानंतर इथे-तिथे थांबायचं नाही लगेच घरी यायचं मुलांशी बोलायचं नाही लगेच घरी येवून सांगायचं मग शाळेत जाण्याच्या धडपडीने, मित्र- मैत्रिणींना भेटण्याच्या आशेने त्यांचे नियम पाळयासाठी तयार व्हावे लागेल.

जसजसे दिवस जाऊ लागले तस-तसे समजायला लागले. मला कोणताही आजार झालेला नाही. हे सगळं नैसर्गिक आहे. आपण कितीही नको म्हटलं तरी ते होणारचं. तिचा एकच ध्यासं हे का होतं कशामुळे होतं, कसं होतं, स्त्रीयांनाच का होतं पुरूषांना का नाही, त्यानंतर त्याची हळूहळू माहिती घेण्यास सुरूवात केली, कोणी सांगत नसतं, तू अजून लहान आहेस, तुला काय करायचाय, हया गोष्टी जाणून घेऊन असं म्हणतं. सर्वप्रथम तर सांगण्यासाठी घरातूनच विरोध होऊ लागला. फक्त एवढंच सांगत हे असंच असतं, मग असं झाल्यांवर 4-5 दिवस कोणाच्या जवळ जायचं नाही , मंदीरात जायचं नाही, देवाला शिवायचं

नाही, एका जागी बसून राहायचं, ती मुलगी दुसरी तिसरी कोणी नसून मी स्वत: आहे. मला हे सगळं आवडत नसायचं, राग यायचा, अस करायला लावल्यानंतर असं का करतात असं वाटायचं. आणि मग तेव्हा त्यावेळी मला सुचलेल्या पहिल्या ओळी,

कागदाची नाव होती
पाण्याचा किनारा होता
मित्र-मैत्रिणींचा सहारा होता
खेळण्याची मस्ती होती
मन हे वेडे होते
कल्पनेच्या दुनियेत जगत होते
कुठे आलो या समजूतदारीच्या जगात
यापेक्षा ते भोळे बालपणचं
सुंदर होते

असा का आहे आपला समाज जे नैसर्गिक आहे त्याला देवभोळेपणा का ? एवढं तर आपल्या वैज्ञानिकांनी त्याबद्दल सांगितलं आहे, मग हे सगळेजण काय वेडे झालेत का ? असं का करतात. वैज्ञानिकदृष्टय विचार केला तर सगळयांनी आपले विचार बदलायला हवेत. ज्या रक्तापासून हाडा- मासांचा माणूस तयार होतो मग ते रक्त कलंकित का? वाईट का? कोणी ठरवलं हे सगळं देवाने सांगितलं का? तुम्हाला आपल्या हातापासून निघणारे रक्त आणि हे रक्त यामध्ये काय फरक आहे. हातापायातून रक्त निघलं तर त्याला मलमपट्टी करतात आणि तेच जेव्हा स्त्रीच्या महावारीच्या वेळी झालं तर तिला कलंकित म्हणून समाजापासून वंचित केलं जात. वाटेल तसं वागवलं जातं असं का?

मंदीरात प्रवेश नाकाराला जातो. अहो किती नाजूक असतात त्या मुली त्यांच्या हातातल्या साध्या बांगडया फुटल्यानंतर रडून रडून घर डोक्यावर घेतात. पण त्यांच मन दुखावलं गेलं तर समोर बसलेल्या आईलासुध्दा दाखवत नाहीत. लहानपणापासून स्वत:च मन मारून जगत असतात मग ती आई असो, आज्जी असो. किंवा मुलगी.

आपल्या इथे समाजामध्ये ना इतरांना समजावून सांगण्यापेक्षा स्वत:ला समजावून सांगाव कारण स्वत:त बदल करणं जास्त सोपं असतं, ज्याला समजून

घ्यायचं असतं त्याला एक इशारा पुरेसा असतो आणि ज्याला समजून घ्यायचं नसतं त्याला आयुष्यभरातही ते समजतं नाही.

हर दिन पुजा करने वाली
उन 5 दिनों में मंदीर से
दूर किया जाता है।
ऐसी सांच में भ्रमाया क्यू जाता हा।
महावारी एक शारीरिक प्रक्रिया
फिर इसमें उनको इतना शर्माया
क्यू जाता है।
ये भी खून ही है, जिसे दाग या धब्बा कहा जाता है
यही धब्बा एक पुरूष को भविष्य में पिता बनाता है।
सींच सींच कर यही रक्त एक इंसान को निर्मित कर जाता है
हा ये दाग ही है, जो हर एक घर को पूर्ण बनाता है
बहता है बूँद बूँद ये बेजान से बनाता है
वो स्त्री ही है जो सब यह लेती है,
थकान और स्त्री का कोई संबंध ही नहीं
बस इसीलिए सब कुछ सहना पडता है......
यही दाग मानव चव को गुढ बनाता है
पृथ्वी पर हर एक के जन्म की व्याख्या बनाता है।
सोच जरा खोकली हो तो मिय्या कहलाना है
1 हित को घर की स्त्री से , दुसरी ओर कानाख्या को पूजा जाता है ।

- अनुराधा मार्कड
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20239



# * संविधानातील शैक्षणिक कलम *



कलम 21 अ - प्राथमिक शिक्षणाचा हक्क 2009 पासून

कलम 28 - शिक्षण संस्थामधून धार्मिक शिक्षण देण्याचे संवर्धन

कलम 29 - अल्पसंख्याकाच्या हिताचे संरक्षण व संवर्धन

कलम 30- अल्पसंख्याक वर्गाची शैक्षणिक संस्था स्थापनाचा आणि त्याचे प्रशासन करण्याचा हक्क रद्द केला.

कलम 45 - सहा वर्ष वयोगटातील बालकांची देखभाल व शिक्षण या संबंधीच्या तरतूदी म्हणजेच मोफत व सक्तीचे शिक्षण.

कलम 46 - अनुसूचित जाती जमाती व दुर्बल घटकाचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करणे.

कलम 49 - महत्वाची राष्ट्रीय स्मारके, ऐतिहासिक वास्तूस्थळे व स्थाने इत्यादींचे संरक्षण करणे.


- रच्चा कविता
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं. 11104




# जीवन जगताना



देवाचिये व्दारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या।
हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥

देवाच्या दाराशी तू फक्त क्षणभर उभा राहा सर्वसाधारणपणे देव हा शब्द सर्वांच्या परिचयाचा आहे. परंतू देव म्हणजे काय असे जर विचारले तर या शब्दाचा नेमका अभिप्रेत अर्थ सांगता येणे जरा कठीण आहे.

देव म्हणजे निसर्ग किंवा एक शक्ती आहे या पलीकडे सामान्य माणसांना काही सांगता येत नाही, परंतू देव किवा ईश्वर म्हणजे निसर्ग नव्हे, निसर्ग हे ईश्वराचे ऐश्वर्य आहे. योजना करणारा ईश्वर व त्या योजनेप्रमाणे आपोआप घडत राहणे हा निसर्ग.

एक दुभती गाय आहे. पणा मारकी आहे पण माणसं काय करतात तिचे पाय बांधून दूध काढतात. पण तिचं जे वासरू असतं त्याचं सगळं बळ त्याच्या प्रेमात असल्यामुळे ते पाय न बांधता तिचं दूध पितं त्याला ती कधीही लाथ मारीत नाही. तसा तो परमात्मा जो, त्याला आपणहून शरण जातो. त्याला तो आपल्या वासराप्रमाणे जवळ घेतो.

जगात येताना तुम्ही काय घेऊन आलात जे हरवलं
तुम्ही काय, निर्माण केले जे नष्ट झालं
जन्माला येते वेळी तुम्ही काही बरोबर आणले नाही
तुझ्याजवळ जे सर्व आहे फक्त या पृथ्वीवर असताना
देवाकडून प्राप्त झालं आहे.
या जगात येताना आपण काय घेऊन आलोय.

ज्या वर आपल्याचा अभिमान वाटतो. माझा रंग गोरा आहे. किंवा काळा आहे. रंगभेद असो अथवा शरीर रचना जे काही भेटलं ते त्या देवाकडून तुमच्याकडं जे आहे ते त्या परमेश्वराचे आहे. तुम्ही या पृथ्वीवर आलात तेव्हा तुम्हाला असं वाटत की ही शेती माझी आहे, हे घर माझे आहे. ही नाती माझी आहेत. हा मित्र माझा आहे. हे सोनं माझ आहे, ही गाडी माझी आहे. परंतू माझं माझं करत तू एक दिवस या जगातून जाणार मग त्या वेळेस तुला कोण सोबत आहे? तुझी गाडी जरी मोठी असली तरी शेवटी तुला काय उपयोगाची? तुझं शेत जरी मोठं आहे. परंतू ते तुला सोबत नेता येणार नाही. तुझ्या जाण्यानं नातेवाईकांना दु:ख होईलच परंतू ते किती दिवस राहील सांगा बघू, तू ह्या जगात येताना त्या देवाच्या कृपेने आलास आणि तू त्या देवाचं स्मरण करायचं विसरला त्या देवाचं आभार मानायला विसरला. तू जीवन जगताना मला चांगले मार्क पाडायचे मला चांगली नोकरी हवी, माझं लग्न झालं पाहिजे, आता माझ्या मुलांनी मला सांभाळ करायला हवा, असं तुला वाटतं आणि या सगळयामध्ये ज्यांनी तुला सर्वस्व दिलं त्यालाच विसरून गेला, मग तू त्या देवालाच कसं विसरला? ज्या गोष्टींचा अभिमान वाटतो त्या शेवटपर्यंत टिकणार आहेत का ? याचं विचार कर. येताना काय घेऊन आलात जे जाताना सोबती राहील त्यामुळं तू या गोष्टीवर अभिमान करू नको.

हा देह नाशवंत आहे. मग यावर किती तो गर्व करशील. आपल्या सर्व गोष्टी ज्या तुम्ही कमवणार त्या येथे राहणार आहेत. तुमचा देह हा नाश होवून मातीत मिळणार आहे. कुंभाराला त्याची माती म्हणजे की अरे मला किती तुडवशील शेवटी तुला ही या मातीतच लीन व्हायचं आहे. लाकूड सुताराला म्हणते की, अरे तू मला किती घासशील, मीच तुला फळा आणि पाटी बनून ज्ञान दिलं. मी तुला जळणार आहे.माळयाला त्याची फुल बोलतात अरे आम्हाला किती ओवशील. शेवटी तुझ्या घरची आमचा हार घालून तुला निरोप देणार आहेत. असे हे सर्वांचीच काही तर काम आहेत. परंतु जो व्यक्ती या सर्व गोष्टीसोबत आपल्या देवाला कधीच विसरत नाही. आणि त्या देवावर विश्वास ठेवतो, आणि आपलं काम करत राहतो. त्याला मग त्याच्या आयुष्यात यश असो किंवा अपयश याचा फरक पडत नाही. जीवन जगत असताना आपण ही आपली दु:ख चिंता अडचणी त्या देवावर सोपवा आणि मनात फक्त एकदा त्या परमेश्वराची प्रतिमा तयार करा. तेव्हा तुम्हाला आतून नक्की आवाज येईल, भिऊ नको मी कायम तुझ्या सोबत आहे.

जीवनात तुम्ही काय मिळवलं यापेक्षा तुम्ही किती जणांना आनंदी बनवलं हे महत्त्वाचं आहे.

॥ जय जय राम कृष्ण हरी ॥

- पवार माधुरी
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20244



# शेती अशीच असती



मी माझ्या बहिणीच्या गावी गेले होते. आम्ही गेलो तेव्हा तिचे सासरे शेतात ट्रॅक्टरच्या साहाय्याने धाबे घालत होते. आमचे चहापाणी , पाहुणचार झाला पण बहिणीचे सासरे अजून घरी आले नव्हते. कारण सकाळपासून धाब्याचं काम चालू होतं नी आता थोडचं राहिलं होतं. तोपर्यंत आम्ही सगळेजण बोलत बसलो. सगळेजण बोलत असतानाच बोलत बोलत शेतीच्या विषय निघाला. तेव्हा बहिणीच्या सासूबाई सांगू लागल्या,

' दूरवर एका शून्यात नजर लावून त्या बोलत होत्या, ' ' शेती कुठं सुखाची ? माणसाला वाटतं शेती शेती शेती हाय पण रातं-दिवसा झुलावं लागतंय शेतीसाठी कष्ट करावं लागतं, घाम गाळावा लागतू, लोकांना शेतातल्या पिकाचा आलेला पैसा दिसतू पण, पिक काढेपर्यंत बाजारात नेईपर्यंत किती गेलं, कोण इचारंत नाय. शेतातं पिक पिकवायचं म्हंजी त्या शेतकऱ्यानं पाण्यासाठी आणि लाईटसाठी झोपचं इसरून जायाचं पहाटं तीन ला रानाला पाणी पाजायला उभा राहिलेला गडी रातच्याला कधी आणि किती वाजता अंग टाकलं हे त्येलाबी माहितं नसतं नुसतीच शेती करायचं नायं हे त्येलाबी माहित नाय, पिक कष्टानं फुलवायचं आणि बाजारात फुकाट दिऊन यायचं. आसपणं हुतया। शेवग्याच्या शेंगला खर्च जादा हुतूया आणि भाव मिळलं म्हणलं तवर भाव पडतूया. कांदयाचा भाव 60 रू किलो झाला तर सगळयाची बोंब उठतीया पण रस्त्यावर फुकाट बसून जवा शेतकरी घरी येतू, ढसा-ढसा रडतू तवा कोन इचारत नाय त्याला. लोकांस्नी त्याच्या पोराच्या डोळयातली स्वप्न त्या पिकाच्या येणाऱ्या भावावर अवलंबून असत्यात हे कोणालाच नाही काळतं.

शेती शेती तरी काय? घाम गाळल्याशिवाय फुलत नाय. एखादया साली मेघराजा साथ सोडतू तवा. बियाणं, पिक मेहनतं वाया जाती आणि मग तवा गेलेल्या पिकाच्या 10 % रक्कम विमा म्हणून सरकार तोंडाला पानं पुसतं. एखादया साली पिक चांगली साथ देतं तवा कोरोनासारखी महामारी दगा देती. आलेलं पिक बाहेरच्या राज्याला जातचं नाय।

औंदाची द्राक्षी एक नंबर आली. असं सगळी म्हणायची. सगळयांच्या नजरेतं तिचं टपोरं, मणी लगेच मनात भरायचं पण बाहिर माल जात नसल्यानं व्यापाऱ्यांनी मागच्या सालापेक्षा पाडून मागितली. केलेला खर्च तेवढा निघाला पण आम्ही केलेल्या कष्टाच्या मोबदल्याचं काय ? घामाचं पैसं कुठायं? काहीचं नाही किमानं उन्हाचं औषध चालत नाय म्हणून रातुंध्या औषध फवारणीसाठी केलेल्या सुखाच्या झोपेचं खोबरं, त्याचा तरी मोबदला मिळाला का? मग शेती परवडली का? आणि न्हायं परवडतं म्हणून केलीचं नाय तर करायचं काय ? खायाचं काय ? कष्टाशिवाय पर्यायचं नाय तरं।.

असं त्या बोलत असतानाचं सासरे आले आणि म्हणाले, अगं पाव्हन्यास्नी चहापाणी केलं का नायं ? तेव्हा त्या एकदम सावरून म्हणाल्या व्हय केलंय की, तुम्ही येताय म्हणून थांबल्यात सगळीजण आणि मग सगळेजण भानावर येऊन त्यांच्यासोबत बोलू लागले, गप्पा मारून थोडया वेळाने आम्ही आमच्या घरी जाण्यासाठी निघालो. मात्र माझ्या डोळयातून त्या जे काही बोलल्या तो विचार जातचं नव्हता. खरचं शेती अशी असते का? हा प्रश्न सारखा मनाला पडतं होता आणि मन मात्र सारखं सारखं एक उत्तर सांगत होतं, होय शेती अशीचं असती.....


- शिंदे स्वाती
- बी. एड.प्रथम वर्ष
- रो. नं. 20245




# महाराष्ट्रातील संत परंपरा



सुसंगती सदा घडो। सुजनवाक्य कानी पडो॥

कलंक मातीचा झडो। विषय सर्वथा नावाडी॥

मोरोपंतांच्या केकावली काव्यसंग्रहातील ही एक सुरेख काव्यरचना. यामध्ये मोरोपंत सांगतात, सर्वथा मानवाची प्रगती व्हावी. त्याच्या कानी सृजनवाक्य पडावे, त्याच्या बुध्दीचे अज्ञान दूर व्हावे. याच पध्दतीने सर्व कार्य संत आपल्यासाठी करत असतात. संतांची संगत, संताचे उपदेश मनुष्य विकासासाठी फार मोलाचे ठरतात. संत हे जगाच्या कल्याणासाठी देह झिजवत असतात. समाजातील अज्ञान अंधश्रध्दा नष्ट व्हाव्यात म्हणून दीपस्तंभ बनून ज्ञानरूपी प्रकाशाने समाजाला उजळून टाकण्याचे कार्य ते सतत करत असतात. म्हणूनच म्हणतात,

जगाया कल्याणा। संतांच्या विभतू॥

देह झिजविती परोपकारी॥

महाराष्ट्र ही मर्द मराठयांची तसेच संतांची भूमी. संतांच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेल्या या महाराष्ट्राला संतांची वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. संत ज्ञानेश्वरापासून ते संत गाडगेबाबांपर्यंत अनेक संतांनी आपल्या कार्यप्रणाली ने भारावून टाकले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात परकिय आक्रमणांनी आणि मोगलांच्या जुलमाने प्रजा त्रस्त झालेली असताना, संतांनी

आपल्या अभंग कीर्तनाच्या माध्यमातून  प्रजेची मरगळ दूर करण्याचे कार्य करण्याचा विडा उचलला.  त्या काळचा समाज चातुर्वरणात अडकला होता. धार्मिक कर्मकांडांना महत्त्व प्राप्त झाले होते. अशा काळात ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्गाचा पाया रचला. या ज्ञानियांच्या राजाशिवाय महाराष्ट्राचा इतिहास अपुरा ठरतो. धर्मविज्ञान, तत्वज्ञान सामान्य जनांसाठी संस्कृत भाषेतून मराठीत निर्माण  केले.

ज्ञानेश्वरांनंतरही महाराष्ट्रात संत परंपरा सुरूच होती. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास ही यातील प्रमुख  नावे. या संतांनी  संसार करत असताना भक्ती मार्ग अवलंबण्याचा उपदेश केला.

संत जनाबाई म्हणतात,

धरीता कांडिता, तुज गाईन अनंता॥

यातून आपल्याला संतपरंपरेतील  स्त्रियांची वैशिष्टये आणि वैविध्य दिसून येते.

संत एकनाथांनी समाजाला समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. आपल्याला आज  एशियन खेळ तसेच ऑलिंपिक खेळाचे फार महत्व वाटते, परंतु तीनशे वर्षांपूर्वी समर्थ रामदासांनी बालोपासना व व्यायामाचे महत्व जाणून व्यायाम शाळा तसेच आखाडे सुरू केले होते. त्यांनी प्रयत्नवाद शिकवला होता.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे॥

अशा शब्दांत त्यांनी मानवाला उपदेश केला. त्यांच्या दासबोध या ग्रंथातून आपल्याला सव्दर्तनाची सव्दिचाराचीं शिकवण मिळते.

जे जे का रंजले गांजले । त्यासी  म्हणे जो आपुले ॥

तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा॥

अशा शब्दांत संत तुकाराम महाराजांनी भूतदयेचा मंत्र दिला.  वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरें यामधून तुकाराम महाराजांनी शतकापूर्वी वृक्षाचे महत्व जाणीव करून दिले होते.

ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासें कळस॥

ज्ञानदेवे रचिला पाया म्हणजे भागवत धर्मामधून वारकरी संप्रदायामध्ये आल्यानंतर ज्ञानदेवांनी फक्त वारकरी संप्रदायाचा पाया रचला का तर अजिबात नाही . तर ज्ञानदेवांनी 13 व्या शतकामध्ये अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा पाया रचला. एवढा मोठा अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा धागा पकडून तुकोबा पुढे म्हणतात.

सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियेले नाही बहुमत॥ किंवा

तुका म्हणे सत्य सांगे येतील तें॥

तुम्हाला राग आला तरी चालेल परंतु मी मात्र सत्याची बाजू मांडल्याशिवाय राहणार नाही.

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे म्हणत एका हातात झाडू व दुसऱ्या हातात कटोरा घेऊन संपूर्ण समाज जनजागृतीचे कार्य संत गाडगे महाराजांनी केले. त्यांनी या धर्मजागृतीच्या कळसावर स्वच्छतेची ध्वज पताका फडकावली. समाज प्रबोन हा त्यांच्या कीर्तनाचा गाभा होता. या भारतात बंधुभाव नित्य वसु दे। या काव्यसंगतीमधून समाजाला समतेचा, एकतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामान्यजनांना राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

जनसेवा हीच ईश्वरसेवा असे म्हणत बाबा आमटे, मदर तेरेसा, ताराबाई मोडक या आधुनिक संतांनी मानवाला मानवतेचा संदेश दिला. संतांच्या विचारातील तत्वे ही अनादी अनंत असतात.काळाच्या ओघात समाज बदलतो, परंतु सद्विचार, सत्य, निती, व्यवहार, बंधुता ही संतांची तत्वे त्रिकालाबाधीत आणि अविनाशीच आहेत.त्यांनी केलेल्या उपदेशांचे आपण आचरण करायला पाहिजे. आपल्याला आपल्याला अभिमान हवा.

'संतांनी केलेले कार्य प्रबोधनाचे, हा वसा पुढे चालवणे परम कर्तव्य आमुचें. '

- शिंदे स्वाती
- बी. एड.प्रथम वर्ष
- रो. नं. 20245



# माझा जिल्हा, माझं सोलापूर



कायकवे कैलास.......

12 व्या शतकात श्री शिवयोगी सिध्देश्वर यांनी सोन्नलागी/ सोन्नलापूर ( सोलापूर)

येथे 68 लिंगाची स्थापना करून समाजसुधारणा केली. खरंतर सोलापूर या शहराचा इतिहास अतिप्राचीन काळाचा आहे. सध्याचे सोलापूर शहर हे अहमदपूर, आदिलपूर, काळजापूर, खडारपूर, खान्देवाडी, चपळदेव, जामदारवाडी, फतेहपूर, मुहम्मदपूर, राणापूर, शेखपूर, सन्दलपूर, सोलापूर, सोन्नलगी, सोलापूर आणि वैदकवाडी ह्या 16 गावापासून बनले आहे. या ठिकाणी अनेक राजे महाराजे होऊन गेले. अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेली होती. म्हणून.

' पन्ती जलती है मगर
पन्ती पर तेल नहीं
सोलापूर का नाम लेना
कोई बच्चों का खेल नहीं '

महाराष्ट्र राज्यांमध्ये सोलापूर हे एक प्रसिध्द असे जिल्ह्यांचे ठिकाण आहे. हे शहर भारतातील मुख्य अशा उत्तर- दक्षिण रेल्वे मार्गावर आहे. भौगोलिकदृष्टया विविधतेने नटलेला माझा जिल्हा, माझं सोलापूर आहे. भौगोलिक क्षेत्रफळ 14844.6 चौ. कि.मी. इतका आहे. या शहराला भीमा नदीवर उजनी धरणाचे वरदान लाभले आहे. या धरणाच्या माध्यमातून संपूर्ण शहराचे नंदनवन झाले आहे. म्हणून.........

जेथे आहे पाणी
तेथे आहे नंदनवन
करूया अशा अनमोल
पाण्यास वंदन ..........॥

माझ्या सोलापूर जिल्ह्यांमध्ये 100 कि. मी. परीघ क्षेत्रात प्रमुख धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत ते पुढीलप्रमाणे.

- भुईकोट किल्ला- सोलापूर शहर
- सिध्देश्वर मंदिर- सोलापूर शहर
- डॉ. व्दारकानाथ कोटणीस यांचे स्मारक
- कंबर तलाव
- प्रेरणा भूमी
- स्मृती वन
- सिध्देश्वर वनविहार
- संत दामाजी मंदिर- मंगळवेढा
- हत्तरसंग कुडल – ता. दक्षिण सोलापूर.
- स्वामी समर्थ मंदिर – अक्कलकोट
- श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर- पंढरपूर
- सयाजीराजे पार्क, शिवसृष्टी – अकलूज
- अर्धनारी नटेश्वर मंदिर – माळशिरस
- होळकर वाडा – पंढरपूर
- शिंदे वाडा- पंढरपूर

अशाप्रकारे धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांनी सोलापूरचे वैभव खुलून दिसत आहे. ब्रिटिशांच्या कालखंडात सोलापूर शहरांमध्ये 4 हुतात्म्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली होती. 12 जानेवारी 1931 साली मलप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे, किसान सारडा इ. फाशीवर लटकावले होते. म्हणून या शहराला 'हुतात्मा शहर' म्हणून ओळखला जातो. म्हणून ...........

' वतनवालो वतन को ना बेचना
ये धरती ये अंबर इसे ना बेचना
शहिदोंने जान दी है इनके

वास्ते इनके कफन को ना बेचना.....'

मित्रांनो ........... माझा जिल्हा, माझं सोलापूर.......... असल्यांचा मला खूप अभिमान आहे. कारण हे शहर.

- विडी उत्पादनासाठी
- सोलापूरी चादरीसाठी
- स्मृती उदयानासाठी
- हुतात्मा बागासाठी
- वनविभागासाठी
- माळढोक पक्षी अभयारण्यासाठी
- डाळिंब संशोधन केंद्रासाठी
- हुतात्मा शहरासाठी
- ज्वारीच्या कोठारासाठी
- तेलगू, कन्नड व मराठी भाषा त्रिवेणी संगमासाठी

अशाप्रकारे वेगवेगळया कारणांसाठी सोलापूर शहर प्रसिध्द आहे. माझ्या सोलापूर जिल्हयांमध्ये वेगवेगळया जातीचे, धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता, समता, बंधूता, सहकार्य इ. गोष्टीची जोपासना या ठिकाणी केली जाते. या ठिकाणी केली जाते. म्हणून.........

' तर्क विना मिळे ना पथ
पथाविना सापडेना ध्येय
खूप भावलं मनाला
सलाम माझ्या जिल्ह्याला........'

सोलापूर शहरांचा इतिहास अभिमानाने सांगण्यासारखे आहे. ज्या सोलापूर शहराला ' दुष्काळाचा जिल्हा ' म्हणून ओळखला जातो. त्याचं जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे. अलीकडील काळात या शहराचा विकास झपाटयाने होत आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैदयकीय इ. क्षेत्रांमध्ये खूप मोठया प्रमाणात विकास होत आहे. शाळा महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. 2004 मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. एकूणचं ग्रामीण

भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावं या उद्देशाने हा जिल्हा प्रयत्न करत आहे. म्हणूनचं दिवसेंदिवस शिक्षण  क्षेत्रातील आलेख चढत्या स्वरूपाचा दिसून येत आहे.

शासनाच्या स्मार्टसिटीच्या नियोजनामध्ये आपल्या सोलापूरचे नाव आहे. म्हणून सोलापूर शहर हे स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत आहे.  या जिल्ह्याचा मला अभिमान वाटण्यांचे  कारण म्हणजे माझा लळा या मातीशी जोडला गेलेला आहे. या मातीमध्ये वाहतुकीचा विकास, पायाभूत सेवासुविधा, स्वच्छ मोहिम अभिमान इ. विकास होत आहे म्हणून.........
स्वच्छ सोलापूर........ सुंदर सोलापूर.......
चला तर मग आजचं आपण निर्धार करूया......... स्वच्छ व सुंदर भारत, स्वच्छ व सुंदर सोलापूर बनवूया.......

"   माझा जिल्हा, माझं सोलापूर ........"

म्हणून ..........

" तू जिंदा है, तू जिंदा है
जिंदगी की जीत पर
यकीन कर, अगर कही है
स्वर्ग तो उसे उतारलो जमीन पर "

धन्यवाद....................

- चौलगी रूपाली
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं.  11112



# विनम्रशीलता

विनम्रता हे आपले एक भूषण आहे, असावे घरामध्ये नोकरीमध्ये ही विनम्रता हे आपल्याला इतरांपेक्षा वेगळे करते. विनम्रता म्हणजे लाचारी नव्हे, दुबळेपणा नव्हे तर, आपल्या कर्तृत्वाचा, कार्याचा, पैशाचा, सत्तेचा अहंकार न बाळगता बोलणे.

विनम्रतेचे महत्व – विनम्रता आणि मधुर भाषज्ञ असेल तर तुम्हाला कुठेचं अडचण येणार नाही. तीन गोष्टी माणसांजवळ असाव्यात पैसा, कष्ट आणि मधुर बोलणे. पैसा तर आपल्याकडे नाही, पण कष्ट आणि विनम्र वागणूक देणे आपल्या हातात असते.

तुमचे वर्तन सगळयांशी सहकार्याचे,विजयाचे , प्रेमाचे असेल तर तुमच्या बाजूने केव्हाही अनेक लोक उभे राहतील व तुमचे संरक्षण करतील. अहंकार, ताठा असलेली रागीट माणसे शेवटी एकाकी पडतात. त्यांच्या वाटयालाही कोण उभे राहत नाहीत. स्पष्टवक्तेपणा हा गुण आहे. पण त्याचा अतिरेकच अनेकवेळा दिसतो. म्हणून व्यक्तिमत्व विकसित करायचे असेल तर विनयशीलता आणि मधुर बोलणे यांचा संगम हवे.

विनम्रशीलता वाढविण्यासाठी पुढील प्रयत्न मी करेन........

- नेहमी सर्वांना आदराने वागवेन
- माझे भाषा प्रेमळ ठेवेन.
- लहान – मोठयांचा सन्मान करेन.
- पैसा, प्रसिध्दी या गोष्टीला महत्व न देता माणुसकीपणाला देईन.
- अहंकाराची भावना मूळापासूनच संपवून काढेन.



- चौलगी रूपाली
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं. 11112

# आत्मविश्वास

मनुष्याला जसे जीवन जगण्यासाठि ऑक्सिजनची गरज असते, त्याप्रमाणेच आयुष्य जगत असताना मानवाला आत्मविश्वास हा खूप महत्त्वाचा आहे. आत्मविश्वास हे असे साधन आहे जे जगण्याला सामर्थ्य देते. एखादी अडचण निर्माण झाली की, ती अडचण आपल्यात असलेल्या आत्मविश्वासाच्या बळावरच ते कार्य आपले पूर्ण करू  शकतो.

आत्मविश्वासाच्या बळावरच आपण एखादे कामाचे आराखडा पूर्ण करू शकतो. आत्मविश्वास  ही अशी शक्ती आहे की, जी स्वत:मध्येच आहे, फक्त ती तुम्हाला कळली पाहिजे. तुम्ही स्वत:वर तो विश्वास तो आत्मविश्वास ठेवलात तर तुम्हाला यश प्राप्त होण्यास नक्कीच  मदत होईल.

# स्वाभिमान

या मध्ये स्वत:ला जाणणे खूप महत्त्वाचे आहे. स्वाभिमान हा आपल्यातील एक असा घटक आहे की जो आपल्यातील विश्वास जागृत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो.  व हे जागृत असेल तर आपण आपल्या कर्तृत्वात कोठेच कमी पडत नाही.

स्वाभिमान हा मानवाचा एक गुण आहे. स्वाभिमानी व्यक्ती नेहमी प्रेमाने, विनम्रतेने वागत असतात.  स्वाभिमानी माणसे ही परिश्रम करून किंवा कष्ट करून ध्येयापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करतात. हे लोक कार्य करीत असताना त्यांचे श्रेय ते स्वत:सोबत इतर सहकारी वर्गालासुध्दा देत असतात. ह्याच्यामध्ये कसलाही ही अभिमान नसतो. ते इतरांसोबत चांगलेच वागण्याचा प्रयत्न ते करीत असतात.


- शिंदे प्रतिक्षा
- बी. एड.  व्दितीय वर्ष
- रो. नं .11101




# 'महात्मा ज्योतिबा फुले'



विद्येविना मती गेली
मतीविना निति गेली
नितीविना गती गेली
गतिविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका
अविद्येने केले!.

या ओळीतून विद्येचे महत्व सांगणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते.त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुन होते. जोतिबांचे पूर्ण नाव जोतिबा गोविंदराव गोरे. त्यांचे वडील आणि त्याचे दोन चुलते फुले पुरवत असल्यामुळे त्यांना फुले या आडनावानी ओळखले जाऊ लागले.

महात्मा ज्योतिबा फुले महाराष्टातील नव्हे तर भारतातील एक थोर लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते.त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली.

अशा या महान व्यक्तीची माहिती किंवा जीवनप्रवास थोडक्यात या छोट्याशा व्हिडिओद्वारे मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

व्हिडिओ लिंक -
https://drive.google.com/file/d/1WGd9_hP9vrerFUQY8i1wqU7BUEkekRFa/view?usp=sharing

-रोहिणी देवकते
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20203



## महापुरुषांची Documentary :

काही माणसं आयुष्यभर माणसांसाठी, समाजासाठी अविरत कार्य करीत असतात. खरे तर, सभोवतीचा अमानुषतेचा, अनीतीचा, अनैतिकतेचा, अनाचाराचा, व्यसनाधीनतेचा, वासनाधीनतेचा, अंधश्रद्धांचा अंधार संपवण्यासाठी ही माणसं सतत प्रयत्न करीत असतात. सभोवती अंधार आहे, अशी ओरड करीत राहण्यापेक्षा अंधार घालविण्यासाठी उजेड निर्माण करण्याची धडपड करणं त्यांना फार महत्त्वाचं वाटतं. अशा धडपडीतून चळवळ निर्माण होत असते. अशा धडपडीतूनच नवविचार जन्माला येत असतात. या माणसांना मात्र अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावं लागत असतं, पण अंधारावर विजय मिळवायचा असेल तर उजेड निर्मिल्याशिवाय गत्यंतर नाही, हे त्यांना जसं कळलेलं असतं, तसंच पुन्हा अंधाराचं साम्राज्य येऊ द्यायचं नसेल तर प्राणपणानं उजेडाची पणती जपली पाहिजे, हे देखील त्यांना कळलेलं असतं.अशा माणसांचे प्रयत्न, विचार, जगणं अनेकांना प्रेरणा देत असतं. ही माणसं कधी प्रसिद्धीच्या झोतात असतात, कधी अलक्षितही. या माणसांचं जगणं म्हणजे जिवंत चळवळी असतात.

अशी माणसं त्यांच्या चळवळी, त्यांच्या संदर्भात झालेल्या लेखनाविषयी, साहित्याविषयी आणि त्यांनी केलेल्या विधारक समाज कार्याविषयी आजन्म आपल्या स्मरणात राहतात......अशाच महापुरुषांच्या कार्याचा आढावा त्यांच्या जयंती निमित्ताने Documentary साह्याने घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.....

ए. पी.जे. अब्दुल कलाम Abdul Kalam :

प्रख्यात भारतीय वैज्ञानिक आणि भारताचे अकरावे राष्ट्रपती होते. त्यांनी देशातील काही महत्त्वाच्या संस्थांमध्ये (डीआरडीओ आणि इस्रो) सेवा बजावली. 1998 च्या पोखरन -2 अणु चाचणीतही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. डॉ. कलाम हे भारताच्या अंतराळ कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात सहभागी होते. याच कारणास्तव त्याला ‘मिसाईल मॅन’ असेही म्हणतात.

2002 मध्ये कलाम हे भारताचे राष्ट्रपती म्हणून निवडले गेले आणि आपल्या कार्यकाळानंतर ते शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक सेवेत परत गेले. भारताचा

सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न यांच्यासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

https://youtu.be/iPQnMd4PBOo

होळकर अहिल्याबाई :

(३१ मे १७२५—१३ ऑगस्ट १७९५). एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा बीड) माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले.अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ⇨ ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले.
मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते.

महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.
https://youtu.be/DNM0-Yxf04I

- गाडेकर सुमित
- बी. एड. व्दितीय वर्ष
- रो. नं .11105



# चारोळया

काही नाती बांधलेली
असतात ती खरी नसतात
बांधलेली नाती जपावी
लागतात काही नाती
जपूनही पोकळच राहतात
तर काही नाती
आपोआप जपली जातात
यालाच प्रेम म्हणतात

पाऊल टाकल्याशिवाय वाट चाल
नाही वाटचाल केल्याशिवाय
प्रगती नाही आणि प्रगती
शिवाय माणूस नाही.


- वाघमोडे अश्विनी
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20228




# माझ्या वैयक्तिक रचना

सुखदु:खाच्या हिंडोळया
मनात जपताना
क्षणात हरताना
वाटे पुन्हा मज घ्यावा
ठाव जीवनाचा......

घेऊनी श्वास जगण्याचा
शुरवीर शक्तीचा
विश्वास, प्रेम आणि जिज्ञासेचा
म्हणून वाटे पुन्हा मज घ्यावा ठाव जीवनाचा

माळात उभ्या रोपाप्रमाणे
सावल्याच्या पारंब्याप्रमाणे
सूर्यांच्या किरणाप्रमाणे सोसत
ठाव शांतीचा, विचारांचा
वाटे पुन्हा मज घ्यावा ठाव जीवनाचा

समुद्रांसारखी विशाळ काय बनता
तेलांप्रमाणे काठ करित जावा
घसरून ही मुंगीप्रमाणे
डोंगर सर करित जावा
वाटे पुन्हा मज घ्यावा ठाव जीवनाचा

आदर्श गुणांची घ्यावी शिजोरी
कष्टाची, मेहनतीची गुज सारी
आयुष्य वेचीत जावे
सुखदु:खाची गुंफण सारी
म्हणून वाटे पुन्हा मज घ्यावा ठाव जीवनाचा ॥ जीवनाचा॥

- पटेल सद्दाम
- बी. एड. प्रथम वर्ष
- रो. नं. 20234



# माझी  मावशी

आई आणि मावशी
आई म्हणजे माझा जन्म...........
